रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग | आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | वर्ष ८७ | अंक ३४४ | पृष्ठे ८ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025) www.krushival.in


# कृषीवल

रायगड, मंगळवार, दि. २१ मे २०२४

किंमत ४ ₹


## ‘अटक टाळण्यासाठी उमेदवारी’

**मुंबई :** ईडीची चौकशी सुरू झाल्यामुळे पक्ष बदलला, असं रवींद्र वायकर यांनी स्वतःच मुलाखतीतून सांगितलं आहे. आर्थिक गुन्हे शाखेच्या प्रकरणात ई-समरी द्या, मग उमेदवारी घेईल, असंही त्यांनी सांगितलं होतं. त्यामुळे त्यांची अटक टळली आणि आर्थिक गुन्हे शाखेच्या तपासाचाही टांगती तलवार टळली, असा दावा गजानन कीर्तीकर यांनी केला आहे. महायुतीसोबत असणाऱ्या गजानन कीर्तीकर यांनीच हे विधान केल्याने राजकीय वर्तुळात उलट-सुलट चर्चा रंगत आहे. दरम्यान, निवडणुकीत सर्वच उमेदवार तुल्यबळ पान २ वर

## आज बारावीच्या परीक्षेचा निकाल

**अलिबाग :** फेब्रुवारी - मार्चमध्ये झालेल्या बारावीच्या परीक्षाचा निकाल जाहीर कधी होणार याकडे पालकांसह विद्यार्थ्यांचे लक्ष लागून राहिले होते. अखेर ही उत्कंठा संपली असून मंगळवारी (दि. २१) दुपारी एक वाजता ऑनलाईन निकाल जाहीर होणार आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळाच्यावतीने एचएससी म्हणजेच बारावीची परीक्षा २१ फेब्रुवारी पासून सुरू झाली. या परीक्षेसाठी एकूण ३१ हजार ९४३ विद्यार्थी बसले होते. १९ मार्चला परीक्षा संपली. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्यांसह पान २ वर

**देशात ४९ जागांसाठी ५७.३२ टक्के मतदान** | **राज्याला सलग सुट्ट्यांचा फटका** | **राज्यात फक्त ४८ टक्के मतदान, देशाचाही टक्का घसरला** | **देशातील दिग्गजांची प्रतिष्ठा पणाला**

# मतदारांचे व्हेकेशन, उमेदवारांना टेन्शन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी सोमवारी (दि.२०) मतदान झाले. देशातील एकूण ६ राज्यं आणि दोन केंद्रशासित प्रदेशात ४९ जागांसाठी मतदान पार पडले. महाराष्ट्रातला हा मतदानाचा शेवटचा टप्पा होता. मुंबईतील सर्व सहा मतदारसंघ, ठाणे, कल्याण, भिवंडी, नाशिक, दिंडोरी आणि धुळे या १३ जागांवर सोमवारी मतदारांनी आपला हक्क बजावला. अन्य चार टप्प्यांची आकडेवारी पाहता राज्यात पाचव्या टप्प्यातील मतदानाच्या टक्केवारीत कमालीची घट झाल्याचे दिसून आले. मतदानाच्या दिवशी सुट्टी जाहीर केल्यामुळे मुंबईकरांनी शुक्रवारी सायंकाळीच पर्यटनस्थळांकडे मोर्चा वळविला. मतदान करण्याच्या आवाहनांकडे पाठ फिरवून आठवड्याच्या पिकनिकचे बेत आखण्यात आले. पर्यटनस्थळांमध्ये बुकिंग फुल झाले. त्यामुळे मुंबई भागातील अनेक ठिकाणच्या टक्क्यांमध्ये घट झाली.**

महाराष्ट्रातील १३, उत्तरप्रदेशातील १४, पश्चिम बंगालमधील ७, बिहारमधील ५, झारखंडमधील ३, ओडिशातील ५, जम्मू-काश्मीरमधील १ आणि लडाखमधील १ जागा आहे. विशेष म्हणजे, सात टप्प्यांत होणाऱ्या लोकसभा निवडणुकीमध्ये पाचव्या टप्प्यात सर्वात कमी जागांवर मतदान होणार आहे. विशेष म्हणजे, पाचव्या टप्प्यातील निवडणुकीमध्ये अनेक दिग्गजांच्या भवितव्याचा फैसला होणार आहे. यामध्ये काँग्रेस नेते राहुल गांधी, केंद्रीय मंत्री राजनाथ सिंह आणि स्मृती इराणी आणि जम्मू-काश्मीरचे माजी मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांचा समावेश आहे. पान २ वर

## महाराष्ट्रातील हायव्होल्टेज लढती




**राज्यातील पाचव्या टप्प्यातील एकूण १३ लोकसभा मतदारसंघनिहाय टक्केवारी पुढीलप्रमाणे**

भिवंडी- ४८.८९ टक्के
धुळे- ४८.८१ टक्के
दिंडोरी- ५७.०६ टक्के
कल्याण ४१.७० टक्के
मुंबई उत्तर ४६.९१ टक्के
मुंबई उत्तर मध्य ४७.३२ टक्के
मुंबई उत्तर पूर्व ४८.६७ टक्के
मुंबई उत्तर पश्चिम ४९.७९ टक्के
मुंबई दक्षिण ४४.२२ टक्के
मुंबई दक्षिण मध्य- ४८.२६ टक्के
नाशिक ५१.१६ टक्के
पालघर- ५४.३२ टक्के
ठाणे ४५.३८ टक्के

**राज्यांची टक्केवारी**

बिहार ५२.५५ टक्के
जम्मू-कश्मीर ५४.२१ टक्के
झारखंड ६३.०० टक्के
लडाख ६७.१५ टक्के
महाराष्ट्र ४८.८८ टक्के
ओडिशा ६०.७२ टक्के
उत्तर प्रदेश ५७.३३ टक्के
पश्चिम बंगाल ७३.०० टक्के

## विरोधातलं मतदान टाळण्यासाठी जाणीवपूर्वक दिरंगाई

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

**पहाटे पाच वाजले तरी अधिकाऱ्यांना सोडू नका; मतदानाच्या ढिसाळ कारभारावर उद्धव ठाकरेंचा हल्लाबोल**

ठाकरे गटाला ज्या ठिकाणी मतदान जास्त पडतंय त्या ठिकाणी केंद्रावर जाणूनबूजून विलंब केला जातोय. मतदारांना मुद्दामून ताटकळत ठेवल्याचं दिसतंय असा आरोप उद्धव ठाकरे यांनी केला. कितीही वेळ लागला तरी मतदारांनी मतदान करावं, असं आवाहनही त्यांनी केलं. उद्धव ठाकरे यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यावेळी त्यांनी मतदारांना हे आवाहन केलं.

मतदारांमध्ये उत्साह मोठा असून निवडणूक आयोगाकडून मतदान करण्याचं पान २ वर

**आजचा अग्रलेख**
**लढाई संपणार नाही**

## वेधक

### दुकानाला आग

**पनवेल :** उन्हाचा पारा जसा चढतो तसाच दिवसेंदिवस आगीच्या घटनेत वाढ होत आहे. पनवेल शहरातील बुरहाणी ट्रेडर्स या दुकानाला आग लागल्याची घटना सकाळी १० वाजण्याच्या समारास घडली. शहरातील कापड बाजार परिसरातील मोठ्या प्रमाणात सराफ दुकाने आहेत. येथील बांठिया ज्वेलर्सच्या बाजूला असलेल्या बुरहाणी ट्रेडर्स दुकानाला आग लागली. शॉर्ट सर्किटने आग लागल्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. या घटनेत दुकानातील सर्व सामान जळून खाक झाले आहे. घटनास्थळी त्वरित पनवेल महानगर पालिकेचे अग्निशमन पथक दाखल झाल्याने आगीवर नियंत्रण मिळविण्यात आले. घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

## कर्जतमध्ये राष्ट्रवादीची ‘दादा’गिरी

- आम्ही स्वतंत्र म्हणत आम दारकीचा निर्धार
- महायुतीत अलबेल असल्याचा नेत्यांचा दावा

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

लोकसभा निवडणूक संपली, त्याच संध्याकाळी राष्ट्रवादी अजित पवार गटाने कर्जत विधानसभा मतदार संघात आपली दादागिरी दाखविण्यास सुरुवात केली आहे. कर्जत विधानसभा मतदारसंघात विळा भोपळ्याचे वैर असलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांच्यातील मैत्री १३ मे रोजी



संध्याकाळी संपली आहे. आता आम्ही महायुतीच्या जोखडातून मुक्त झालो असून कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला आहे. मात्र आता आम्ही स्वतंत्र असून पान २ वर

## ‘समग्र’ अंतर्गत ३६ लाख पुस्तकांचे वितरण

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ हे बालभारती प्रकाशनाद्वारे इयत्ता पहिली ते बारावीची सर्व विषयांची मिळून जवळपास चार कोटी पाठ्यपुस्तके छापून वितरित करते. पुस्तकांचा पुरवठा सुरळीत व्हावा, यासाठी राज्यात सध्या ९ भांडारे आहेत. यापैकीच एक भांडार पनवेलमध्ये असुन याठिकाणाहून ३६ लाख पुस्तकांच्या वितरणाला सुरुवात झाली आहे.

> मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, कन्नड, गुजराती, सिंधी, अरबी, बंगाली, तमिळ या दहा भाषांमधील पुस्तके आहेत. पुस्तकांच्या वितरणाला सुरुवात झाली आहे. या महिन्याअखेर पनवेल येथून ३६ लाख पुस्तकांच्या प्रति वितरित होतील.
> – पी.एम. सुपे. (व्यवस्थापक, बालभारती पनवेल)

रायगड, ठाणे आणि पालघर या जिल्हा परिषदांसह ठाणे, नवी मुंबई, उल्हासनगर, कल्याण, डोंबिवली, मीरा-भाईंदर, भिवंडी, निजामपूर आदी पालिकेच्या शिक्षण विभागाला पनवेलमधुन पुस्तकांचे वितरण केले जाते. शासकीय शाळा शिक्षणाधिकाऱ्याकडे पुस्तकांची मागणी करतात. पान २ वर

## अहमदाबाद विमानतळावर घातपाताचा कट उधळला

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

अहमदाबाद एटीएसने आयएसआयएसच्या चार दहशतवाद्यांना बेड्या ठोकल्या आहेत. अहमदाबाद विमानतळावरुन चार दहशतवाद्यांना एटीएसने अटक केली आहे. अटक करण्यात आलेले चारही दहशतवादी मूळचे श्रीलंकेचे आहेत.

गुजरात पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, भारतामध्ये मोठा दहशतवादी हल्ला करण्याच्या इराद्याने श्रीलंकेतून दहशतवादी पाठवण्यात आले होते. ते श्रीलंकेहून चेन्नईमार्गे अहमदाबादला पोहोचल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. गुजरात एटीएसने मिळालेल्या माहितीच्या आधारावर चारही आरोपींना बेड्या ठोकल्या. दहशतवाद्यांना टार्गेट पान २ वर

## पीकअप पलटी होऊन अपघात

### १७ आदिवासी बांधवांवर काळाचा घाला, छत्तीसगडमधील घटना

**। छत्तीसगड । वृत्तसंस्था ।**

छत्तीसगडमधील कावर्धा जिल्ह्यात सोमवारी (दि.२०) पीकअप पलटी होऊन भीषण अपघात झाला. या अपघातात १७ लोकांचा मृत्यू झाला, तर १० ते १२ जण गंभीररीत्या जखमी झाले आहेत. आदिवासी बांधव जंगलातून पारंपारिक पानं घेऊन परतत होते. यावेळी हा



अपघात झाला. पीकअपमधील सर्वजण कुई येथील राहिवासी असल्याची माहिती आहे. जखमींना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. बहपानी भागात आला असता चालकाचे नियंत्रण सुटल्याने पीकअप २० फूट खोल दरीत कोसळली असल्याचे सांगण्यात येत आहे.

भीषण अपघात घडल्यानंतर छत्तीसगडचे मुख्यमंत्री विष्णूदेव साय यांनी शोक व्यक्त केला. ट्वीटरवरुन पान २ वर

## ३२ जिल्ह्यांना उष्माघाताचा फटका

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

जगाला हवामान बदलाचा फटका बसत आहे. देशातील अनेक राज्यांना उष्णतेसोबतच अवकाळी पावसाची समस्याही भेडसावत आहे. मुंबईसह संपूर्ण महाराष्ट्रातही हीच परिस्थिती आहे. या सगळ्यात राज्यातील ज्या भागात कडाक्याची उष्णता असल्याने उष्णतेच्या लाटेला अनेक जण बळी पडत आहेत.

गेल्या ७५ दिवसांत ३२ जिल्ह्यांतील २४१ जणांना उष्माघाताची लागण झाल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. त्यापैकी काही जिल्ह्यात किमान ३२ जण उष्णतेच्या लाटेचे बळी ठरले आहेत. उष्माघाताचे रुग्ण कमी नोंदवले जात असले, तरी आरोग्य विभाग मात्र अलर्ट मोडवर असल्याचे दिसून येत नाही.

३२ जिल्ह्यांपैकी सर्वाधिक रुग्ण हे जालना, नाशिक, बुलडाणा जिल्ह्यातील असल्याचे सांगितले. आरोग्य विभागाच्या पान २ वर

# माथेरान झाले १७४ वर्षांचे

**मिनीट्रेन आजही ठरतेयं पर्यटकांचे आकर्षण**

**प्रदूषणमुक्त असे अद्वितीय पर्यटनस्थळ**

**। माथेरान । वार्ताहर ।** थंड वाऱ्याचे शहर, लाल मातीचा रांगडा सुगंध, हिरवा शालू पांघरलेली डोंगररांग, गर्द वनराई, घोड्यांच्या टापांचा आवाज या वर्णनावरून साहजिकच आपल्या डोळ्यासमोर एक चित्र उभं राहिलं असेल ते म्हणजे सह्याद्री घाटाच्या पर्वतरांगेत एका कुशीत वसलेले रायगड जिल्ह्यातील एक प्रदूषणमुक्त असे अद्वितीय पर्यटनस्थळ आपलं माथेरान. माथेरान या अक्षरांना अस्तित्वात येऊन आज १७४ वर्ष पूर्ण झाली आहेत. माथेरानचे नाव सध्यातरी जगाच्या नकाशावर प्रकाशझोतात आहे.



**कसे जाल ?**

मुंबई पुण्याहून ट्रेनने नेरळ रेल्वे स्थानकात उतरून टॅक्सीने माथेरानला जाता येते. नेरळवरून अनेक पर्यटक पायी देखील निसर्गाचा आनंद घेत माथेरान गाठतात.

**काय फिराल ?**

माथेरानमध्ये अनेक पॉईंट्स आहेत. इको पॉईंट, मंकी पॉईंट, हनिमून पॉईंट, सिलिया पॉईंट, सनसेट पॉईंट, मॅलेट पॉईंट, पॅनोरमा पॉईंट, खंडाळा पॉईंट, वन ट्री हिल, अलेक्सझंडेर पॉईंट, रामबाग पॉईंट असे अनेक पॉईंट फिरण्यासारखे आहेत.

१९०५ मध्ये केवळ हिलस्टेशन असल्याने या गावाला नगरपरिषदेचा दर्जा देण्यात आला आहे. १९०७ मध्ये सर आदमजी पिरभोय आणि अब्दुल हुसेन आदमजी पिरभोय या पितापुत्रांनी नेरळ-माथेरान अशी मिनीट्रेन सेवा स्वखर्चाने त्याकाळी उपलब्ध करून दिल्यामुळे इथे पर्यटकांची संख्या वाढत गेली, ती आजमितीपर्यंत वाढतच आहे. जवळपास साठ हॉटेल्स पाचशे पेक्षाही अधिक लॉजिंग त्याचप्रमाणे शासकीय निवासस्थाने पर्यटकांना सेवा देत आहेत.सध्या नगरपरिषदेच्या सभागृहात कुणीही सत्ताधारी गट नसल्याने या गावाचा १७४ वा वाढदिवस पालिकेमार्फत साजरा केला जाणार आहे.






२१ मे हा माथेरानचा स्थापना दिवस. आकाशाला गवसणी घालणारे उंचच्या उंच डोंगर, तर डोंगरदऱ्यांना येथे व्यापून टाकणारं घनदाट जंगल, रंगीबेरंगी फुलांचे ताटवे आणि उंचच्या उंच कड्यावरुन कोसळणारे पांढरे शुभ्र धबधबे, घाटवळणाचे नागमोडी रस्ते, दाट धुक्याची चादर, वनश्रीत पानांची सळसळ, झाडांवर माकडांच्या झुंडी, निरव शांततेत पक्षांची किलबिल, पान २ वर




वे|ध|क

## तरुणाईची पुस्तकांकडे पाठ

**रसायनी :** इंटरनेटच्या मायाजालाने छोट्यांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांवर आपली मोहिनी घातल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. मैदानी खेळांबरोबरच वाचन संस्कृतीही मागे पडत चालली असून अनेक वाचनीय पुस्तकांकडे चक्क पाठ फिरवली जात असल्याचे दिसत आहे. रसायनी परिसरातील तरुणाई व्हॉटस अप, फेसबुकवरुन दिवसभर चाटींग करण्यात गुंतली असून पुस्तकांपासून दुरावलेली आहेत. वाचनालयातील पुस्तके, त्याचबरोबर बाजारपेठेच्या पुस्तक स्टॉलवरील वाचनीय पुस्तक खरेदी करण्यासाठी तरुणाई फिरकत नसल्याने काही विक्रेत्यांचे म्हणणे आहे.

# युरिया खताचा तुटवडा

**। नागोठणे । वार्ताहर ।**

**रायगड जिल्हा हा भाताचे कोठार म्हणून ओळखला जातो. सध्या खरीप हंगाम सुरू झाला आहे. अशावेळी शेतकऱ्यांना आवश्यक असलेली भात बियाणे व खताचा पुरवठा हा जवळच्या कृषी सेवा केंद्रातून केला जातो. सध्या बहुतेक कृषी केंद्रावर भात बियाणे मोठ्या प्रमाणात उपलब्ध झालेले दिसून येत आहे. दुर्गम भागातील व आदिवासी वाड्यांवरील शेतकरी राजा भाताबरोबरच युरिया खत सुध्दा एकत्रितपणे सोबत घेऊन जात असतात. मात्र, हे खत कृषी सेवा केंद्रांवर अद्याप उपलब्ध न झाल्याने शेतकरी बांधवांतून तीव्र संताप व्यक्त करण्यात येत आहे.**



गेल्या दहा दिवसांपासून शेतकरी नागोठण्यातील खताच्या दुकानात हेलपाटे मारत आहेत. मात्र, आजपर्यंत हे युरिया खत उपलब्ध न झाल्याने नागोठणे विभागांतील शेतकरी त्रस्त झाले आहे. या शेतकऱ्यांनी आज नागोठण्यातील दुकानात येऊन आर.सी.एफ. कंपनीवरील आपली नाराजी व्यक्त केली. शेतकरी लांबच्या ठिकाणी राहत असल्याने व खास खत खरेदीसाठी पुन्हा दुकानात येणे त्यांना परवडत नसल्याने शेतकरी निव्वळ भात बियाणे विकत घेण्यापेक्षा फक्त चौकशी करून जात आहेत. पण नेहमीप्रमाणे आरसीएफ कंपनीतून ट्रांसपोर्टचे कारण पुढे करण्यात येत असल्यामुळे खरीप हंगाम सुरू झाला तरी कृषी केंद्रांवर अद्याप खते उपलब्ध झालेली नाहीत. यामुळे शेतकऱ्यांमध्ये प्रचंड रोष निर्माण होत आहे. त्यामुळे आरसीएफ कंपनीने आवश्यकता असलेल्या जिल्ह्यातील नागोठणे, रोहा, पाली व पेणमधील काही कृषी केंद्रावर खते त्वरित उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी शेतकऱ्यांकडून व कृषी केंद्र धारकांकडून होत आहे.

> **नागोठण्यात झालेली खताची टंचाई ही गंभीर बाब आहे. त्यामुळे तालुका व जिल्हा कृषी अधिकारी तसेच संबधित यंत्रणेने यावर लवकरात लवकर तोडगा काढावा.**
> **-जयंत वाघ, संचालक, वाघ कृषी सेवा केंद्र, नागोठणे**

# गर्भसंस्कार शिबिराचे आयोजन

**। पनवेल । वार्ताहर ।**

नील हॉस्पिटल येथे रविवारी (दि.१९) मोफत गर्भसंस्कार शिबीर आयोजित करण्यात आले होते. यावेळी अनेक गर्भवती महिलांनी या गर्भसंस्कार शिबीराचा लाभ घेतला.

स्त्रीरोग व गर्भ संस्कार तज्ञ बीके डॉ.शुभदा नील यांनी गर्भवती महिलांना मोलाचे मार्गदर्शन केले व मेडिटेशन करवून घेतले. यामुळे गर्भवती महिलांचा ताणतणाव दूर होउन त्या आनंदी राहण्यास मदत होते. गर्भवती माता व बाळ स्वस्थ, खुश राहतात. रोज गर्भवती महिलांनी व्यायाम, प्राणायाम व मेडिटेशन करावे जेणे करून नॉर्मल डिलिव्हरी होण्यास मदत होते, असे वक्तव्य त्यांनी केले. बाळ चरित्रवान, बुद्धिवान व गुणवान होण्यासाठी सुद्धा त्यांनी मोलाचे मार्गदर्शन केले. या मोफत गर्भसंस्कार शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गर्भवती महिलांनी घ्यावा, असे आवाहन डॉ. शुभदा नील यांनी केले आहे.



# रस्त्यालगतचे होर्डिंग्ज धोकादायक




**। रसायनी । वार्ताहर ।**

वादळी वाऱ्यामुळे घाटकोपर येथील होर्डिंग्ज कोसळून अनेक निष्पापांचा जीव गेला. या घटनेवरून राज्यभरात अनधिकृत होर्डिंग्जचा विषय ऐरणीवर आला आहे. काही ठिकाणी स्ट्रक्चरल ऑडीटच्या सुचना तर काही ठिकाणी होर्डिंग्ज मालकांना नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. असेच मोठमोठे होर्डिंग्ज दांडफाटा, टाटापॉवर हाऊस, मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गालगत, रिस, टिसीआय गोडाऊनजवळ, सेबी एमआमडीसी वळण आदी ठिकाणी उभारण्यात आले आहेत. वादळी वाऱ्यामुळे हे होर्डिंग्ज कोसळून मोठी मनुष्यहानी होऊ शकते.

या होर्डिंग मालकांना नोटीसा द्याव्यात. तसेच, धोकादायक होर्डिंग्ज त्वरीत हटविण्यात यावेत, अशी मागणी रसायनीकर करत आहेत.

# श्रमदान शिबिराचे आयोजन



**। उरण । वार्ताहर ।**

सारडे विकास मंचच्या संकल्पनेतून कोमणादेवी ऑक्सीजन पार्कची निर्मिती झाली. या पार्कमध्ये असणाऱ्या छोट्या डोहाची सफाई गेली तीन वर्ष सारडे विकास मंचातर्फे करत आहे. मातीने भरलेल्या डोहाची सफाई सदाबहार दोस्ती प्रतिष्ठान गडप्रेमी गणेश भोईर, सागर पाटील, हरिश्चंद्र म्हात्रे खोपटे यांच्या आयोजनातून करण्यात आली. पावसाळ्यात येणाऱ्या पर्यटकांना मनसोक्त पोहण्याचा आनंद मिळावा यासाठी सारडे विकास मंच हा प्रयत्न करीत आहे. हा डोह सफाई करून पाणी साठवण्याजोगे तयार केला. यासाठी सदाबहार दोस्ती प्रतिष्ठानचे हरिश्चंद्र म्हात्रे, संतोष जोशी, तुकाराम गावंड, कामेश्वर म्हात्रे, सचिन पाटील, अरुण म्हात्रे, कैलास पाटील, जितेंद्र,म्हात्रे, विजय गावंड, डॉ. हिराचंद पाटील, प्रतीक पाटील आदींनी या उपक्रमास हातभार लावला.

# रक्तदान शिबिराचे आयोजन

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शहरातील शासकीय रुग्णालयांमध्ये काही प्रमाणात रक्तपेढींमधील साठा कमी पडू लागला आहे. हीच गरज लक्षात घेऊन 'सक्षम युवा प्रतिष्ठान'च्यावतीने रक्तदाता कै. प्रणय प्रदिप हरवंदे यांच्या २८ व्या जन्मदिनाचे औचित्य साधून रविवारी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत मिरारोड येथील प्रेमा लक्ष्मण विद्यालय पेणकरपाडा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन केले आहे. प्रणय हरवंदे याच्या निधनानंतर सक्षम युवा प्रतिष्ठानच्यावतीने त्याच्या स्मृतीप्रित्यर्थ जन्मदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन प्रतिवर्षी केले जाते. रक्तदान शिबिरासंदर्भात अधिक माहितीकरीता ८८९८८४०८४८ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे व जास्तीत जास्त जणांनी रक्तदान करण्याचे आवाहन हरवंदे परिवाराने केले आहे.



# गारव्यासाठी पाणवठ्याचा आधार

**। रसायनी । वार्ताहर ।**

उन्हाच्या झळा अधिकच जाणवू लागल्याने मुक्या प्राण्यांना पाण्यात गेल्याशिवाय गारवा मिळत नाही. म्हणून गुरे उन्हाच्या त्रासामुळे गारवा मिळण्यासाठी डबक्याचा आधार घेताना दिसत आहेत. मुके प्राणी पाण्यात राहून आपले शरीर थंड करण्याचा प्रयत्न करत असल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे. पाताळगंगा परिसरात जनावरे झाडाखाली बांधली जातात. परंतु, सावली एका ठिकाणी स्थिर नसल्याने याचा फटका मुक्या प्राण्यांना बसल्याचे दिसून येते. उष्म्याचा पारा अधिकच वाढल्याने मुक्या जीवांच्या कळा वाढत आहेत.

पान १ वरुन

## मतदारांचे व्हेकेशन, उमेदवारांना टेन्शन

राज्यातील अनेक भागात काही ठिकाणी संथगतीने मतदान सुरु असल्याचे पाहायला मिळाले. तसेच ईव्हीएम मशिन बंद असल्याचा प्रकारही समोर आल्याचे आरोप करण्यात आले.

## विरोधातलं मतदान टाळण्यासाठी जाणीपूर्वक दिरंगाई

आवाहन केलं जातंय. मात्र अशातच निडणूक आयोग हा भाजपचा घरगडी असल्याप्रमाणे काम करत असून पक्षपातीपणा करत आहे. मतदान केंद्रावर जाणूनबूजून अधिकाऱ्यांकडून वेळकाढूपणा केला जातोय. मतदारांनी मतदानाला उतरवू नये, त्यांनी बाहेरच्या रांगा पाहून कंटाळून परत जावं यासाठी सरकारचा डाव आहे. ज्या ठिकाणी तुम्हाला मतदानाला जाणून बूजून वेळ केला जातोय, त्यावेळी तुम्ही जवळच्या शिवसेना शाखेला त्याची माहिती द्या, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

## आज बारावीच्या परीक्षेचा निकाल

पालकांना परीक्षाच्या निकालाची प्रतिक्षा लागून राहिली होती. निकालाची तारीख कधी जाहीर होणार याकडे लक्ष लागून राहिले होते. मे महिना उजाडताच निकालाची उत्कंठा अधिकच वाढली होती. अखेर ही उत्कंठा संपली आहे.

बारावीच्या परीक्षेचा निकाल मंगळवारी दुपारी एक वाजल्यापासून जाहीर होणार आहे. घरबसल्या अथवा सायबर कॅफेमध्ये जाऊन विद्यार्थ्यांना निकाल पहाता येणार आहे. त्यासाठी शासनाच्या अधिकृत संकेत स्थळावर विद्यार्थ्यांना निकाल पहाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. mahresult.nic.in , http://hscresult.mkcl.org, www.mahahsscboard.in, https://results.digilocker.gov.in, http://results.targetpublications.org या संकेतस्थळावर निकाल पहावयास मिळणार असल्याची माहिती रायगड जिल्हा परिषद माध्यमिक विभागाकडून सांगण्यात आले आहे.

## 'अटक टाळण्यासाठी उमेदवारी'

असतात. मुंबई उत्तर पश्चिम लोकसभा मतदारसंघातही यंदा काँटे की टक्कर होत आहे. त्यामुळे नक्की कोण जिंकणार, हे आज सांगता येणार नाही. मी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा नेता आहे. त्यामुळे मला जमेल तेवढा प्रचार रवींद्र वायकर यांचा केला आहे. मी मतदानही रवींद्र वायकर यांच्या धनुष्यबाणाला दिलं, असंही गजानन कीर्तीकर यांनी म्हटलं आहे.

## 'समग्र' अंतर्गत ३६ लाख पुस्तकांचे वितरण

त्यानंतर शिक्षणाधिकारी एमपीएससीला याबाबत माहिती देतात. त्यानंतर बालभारती या पुस्तकांचे वितरण करते. १५ मे ला या पुस्तकांचे वितरण सुरु झाले आहे. समग्र शिक्षा अभियानांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी पाठ्यपुस्तके हातात पडतील, असे नियोजन शिक्षण विभागाकडून करण्यात आले आहे.

जिल्ह्यातील शासकीय, आश्रमशाळा, खासगी अनुदानित शाळा तसेच महानगरपालिका, जिल्हा परिषदेच्या सर्व शाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी पाठ्यपुस्तके वितरित केली जातात. यंदाही शाळेच्या पहिल्या दिवशी म्हणजे १५जूनला पुस्तके विद्यार्थ्यांच्या हाती पडावीत, यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

## पीकअप पलटी होऊन अपघात

त्यांनी दु:ख व्यक्त केले आहे. विष्णूदेव साय यांनी लिहिले, कबीरधाम जिल्ह्यातील कुकदूर क्षेत्रात बाहपानी गावाजवळ पीकअप पलटी होऊन १७ ग्रामस्थांचा मृत्यू झाला. पीकमध्ये जवळपास २० ते २५ लोक होते. तर ४ जण जखमी झाल्याची दु:खद घटना घडली. जखमींवर उपचार व्हावे, यासाठी जिल्हा प्रशासनाला आदेश दिले आहेत.

## अहमदाबाद विमानतळावर घातपाताचा कट उधळला

लोकेशनवर पोहचण्याआधीच ताब्यात घेण्यात आले आहे.

अटक करण्यात आलेले चारही पाकिस्तानमधील हँडलरच्या संपर्कात होते. त्यांनी मोठा कट आखला होता. हे दहशतवादी पाकिस्तानातील आदेशाची वाट पाहत होते, असेही समोर आले आहे. या दहशतवाद्यांना शस्त्रेही स्वतंत्रपणे पोहोचवली जाणार होती. एटीएसने या दहशतवाद्यांच्या फोनमधून एन्क्रिप्टेड चॅट जप्त केले आहेत. एटीएसकडून चारही दहशतवाद्यांची कसून चौकशी करण्यात येत आहे. चॅट्समधून बरीच माहिती उघड झाली आहे.

## ३२ जिल्ह्यांना उष्माघाताचा फटका

नोंदीनुसार सर्वाधिक २८ रुग्ण जालन्यातील, २७ नाशिक, २१ बुलढाणा आणि २० धुळे जिल्ह्यातील आहेत. सोलापूर १८, परभणी १२, नागपूर ११, सिंधुदुर्ग १०, धाराशिवमध्ये ९ रुग्ण आढळले आहेत. त्याचप्रमाणे पुणे, यवतमाळ, सातारा जिल्ह्यात ७, गडचिरोली, गोंदिया, कोल्हापूर, ठाणे, वर्धा जिल्ह्यात प्रत्येकी ६, अकोला जिल्ह्यात ५, नगर, अमरावतीमध्ये ३, संभाजीनगरमध्ये ३ रुग्ण आढळून आले आहेत. याशिवाय बीड, चंद्रपूर, रायगड जिल्ह्यांत प्रत्येकी २; तर भंडारा, हिंगोली, पालघर, रत्नागिरी, सांगली, वाशीम जिल्ह्यात प्रत्येकी १ रुग्ण आहे.

## कर्जतमध्ये राष्ट्रवादीची 'दादा'गिरी

राष्ट्रवादी काँग्रेसकडून आमदारकी मिळविण्यासाठी तयारी सुरू झाली आहे, असा जोरदार निर्धार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांच्या बैठकीत व्यक्त करण्यात आला आहे. दरम्यान, विधानसभेच्या दृष्टीने कामाला लागा, असा सल्ला ज्येष्ठांनी दिला असून सुधाकर घारे यांना आमदार करण्यासाठी जीवाचे रान करण्याचा सूर राष्ट्रवादीच्या बैठकीत दिसून आला आहे. त्यामुळे कर्जत विधानसभा मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून मिशन विधानसभा सुरू झाले.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्यावतीने कर्जत तालुका कार्यकर्ता आणि पदाधिकारी यांची बैठक आयोजित करण्यात आली होती. यावेळी व्यासपीठावर जिल्ह्याचे नेते सुधाकर घारे, पक्षाचे प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव, भरत भगत, तालुका अध्यक्ष भगवान चंचे, जिल्हा सरचिटणीस राजेंद्र निगुडकर, दीपक श्रीखंडे, अजय सावंत, रंजना धुळे आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी अनेक पदाधिकारी यांनी लोकसभा संपली असून विधानसभेसाठी काही महिने शिल्लक असल्याने पक्षाच्या दृष्टीने कामाला लागा. दरम्यान राष्ट्रवादीच्या अनेक पदाधिकारी यांनी आपण महायुतीचे काम प्रामाणिकपणे केले मात्र मित्रपक्ष आपल्या नावाने उलट चर्चा करीत आहेत. मात्र येणाऱ्या चार तारखेला सत्तेतील ग्रामपंचायतीमध्ये कोणाला मताधिक्य मिळेल, हे सिद्ध होईलच असे बोलून दाखवले.

यावेळी प्रदेश सरचिटणीस अशोक भोपतराव यांनी आपल्याला सुधाकर घारे यांना आमदार करायचे आहे. त्यामुळे दिवस कमी असल्याने महायुतीचा विषय डोक्यातून बाजूला काढा आणि कामाला लागा असा सल्ला दिला. भरत भगत यांनी महायुती आपल्यासाठी १३ मे रोजी सायंकाळी संपली आहे. आपण सर्वांनी महायुतीचा धर्म पाळला आहे, तिकडे यजमान असलेल्या पक्षाचे कार्यकर्ते मतदानाच्या वेळी काय करीत होते. कार्यकर्त्यांनी लोकसभा निवडणुकीत केलेल्या दहापट अधिक काम सुधाकर घारे यांना आमदार करण्यासाठी करावे लागेल आणि त्यासाठी आमची सर्वांची तयारी आहे, असे यावेळी जाहीर केले.

या बैठकीत बोलताना सुधाकर घारे यांनी महायुतीमध्ये काय चालले होते. हे जाहीरपणे बोलायला लावू नका, असा सल्ला नाव न घेता दिला. मात्र शिवसेना जिल्हाप्रमुख जर कुस्ती करण्याचे आव्हान देत असतील तर आम्ही २०१७ प्रमाणे यावेळी देखील तुमचे आव्हान लीलया परतवून लावू, असा विश्वास व्यक्त केला. निवडणुकीची सर्व मैदाने चितपट करण्यात आमचे कार्यकर्ते तयार असून सर्वांचे लक्ष्य निश्चित आहे आणि त्यामुळे आम्हाला कोणीही कोणत्याही धर्मसंकटात टाकू शकत नाही, हे कार्यकर्त्यांनी आजच आपल्या मनात ठरवून घ्यावे आणि कामाला लागावे असे निर्धार व्यक्त केला.

## माथेरान झाले १७४ वर्षांचे

घोड्यांच्या टापांचा लयबद्ध आवाज, गर्द झाडीत लूप्त होणाऱ्या लालमातीच्या पायवाटा, मती गुंग करणाऱ्या खोल दऱ्या, हवीहवीशी वाटणारी शुद्ध हवाहे सगळं काही सामावलंय थंड हवेचं ठिकाण असलेल्या माथेरानमध्ये. अप्रतिम आणि सुंदर दृश्यांनी वेढलेले हे छोटेसे हिल स्टेशन पावसाळ्यात देखील पर्यटकांना आकर्षित करते. हे आपले माथेरान मुंबईपासून ९० किलोमीटर अंतरावर तर पुण्यापासून ११० किमोमीटर अंतरावर वसलेलं आहे. याचा शोध लागला कसा, तर ठाण्याचे तत्कालीन जिल्हाधिकारी सर ह्युज मॅलेट हे त्याकाळी रायगड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना चौक गावापासून त्यांना समोर दिसणारा गर्द वनराई असलेला डोंगर भावला होता. त्यामुळेच त्यांनी आपला मोर्चा या डोंगराच्या दिशेने वळविला. सध्याच्या वन ट्री हिल पॉईंट मार्गाने ते पायवाटेने वर आले होते. इथला रमणीय निसर्ग आणि शुद्ध हवा, गर्द झाडी, खळखळणारे झरे, निरव शांतता यामुळे सर ह्युज मॅलेट यांनी आपला मुक्काम याठिकाणी काही दिवस केला होता. त्यानंतर त्यांनी इथे एक छोटीसी वास्तू उभारली. डोंगराळ भाग असल्याने फक्त घोडे वाहतूक करत असत, म्हणून त्यांनी आपल्या वास्तूचे नाव 'द बाईक' असे केले होते.

# जलाशय कोरडे पडण्याच्या मार्गावर

**रसायनी :** रसायनी पाताळगंगेच्या ग्रामीण भागातील जलाशय कोरडे पडत आहेत. त्यामुळे परिसरात पाणीटंचाईचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता आहे. विहीर, तलाव, छोटे जलसरोवर या सर्व पाण्याच्या स्त्रोतांची पातळी कमी होत आहे. नदीपात्रातील पाण्याचे प्रमाण कमी झाले आहे, तर काही ठिकाणी जलाशय कोरडे पडत आहेत. काही दिवसांत भीषण पाणीटंचाईला सामोरे जावे लागण्याची शक्यता महिलांकडून वर्तविली जात आहे. दरम्यान, दरवर्षी अपेक्षापेक्षा चांगला पाऊस परिसरात पडत असतो. पावसाळ्यानंतर पाण्याचे सरोवर जवळपास डिसेंबरपर्यंत प्रवाहित असतात.

# वाचनालयास एक हजार पुस्तके प्रदान

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

आविष्कार फाऊंडेशन कोल्हापूर या सामाजिक संस्थेकडून खोतवाडी येथील सावित्रीबाई जोतिबा फुले वाचनालयास १०८६ पुस्तके सोमवारी (दि. २०) प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई जोतिबा फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. प्रमुख उपस्थिती व मान्यवरांचे सन्मानचिन्ह, पुस्तक व पुष्प देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. निलेश पाटील यांनी केले.



दरम्यान, अजित रणदिवे व महेश गुरवळ यांनी वाचनालयाचे कार्य व पश्चिम पन्हाळा भागातील ख्याती याविषयी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी संजय पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना हरवत चाललेली वाचन संस्कृती जपण्याचा व स्पर्धेच्या युगामध्ये नवनवीन आव्हाने स्वीकारण्याचा सल्ला दिला. ध्येय, चिकाटी व मेहनतीशिवाय पर्याय नाही हा संदेश त्यांनी आपल्या मनोगततून व्यक्त केला. दरम्यान, एक लाख ५६ हजार रुपयांची १०५६ पुस्तके वाचनालयासाठी सुपूर्द केली. यामध्ये शालेय पुस्तके, कथा, कादंबरी, ग्रंथ, काव्यसंग्रह, आत्मचरित्र अशी विविध पुस्तक पुस्तकांचा या मध्ये समावेश आहे. कार्यक्रमाचे आभार जयदीप अतिग्रे यांनी मानले. या कार्यक्रमासाठी गावचे प्रथम नागरिक अमर रणदिवे, आविष्कार फाऊंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष व संस्थापक संजय पवार, विक्रम पाटील, अजित रणदिव व ग्रामस्थ उपस्थित होते.

# नेरळ नळपणी योजनेचे काम ठप्प

## ■ मुख्य उद्भव विहिरीचे काम सहा महिन्यांपासून बंद

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्वात मोठी योजना असलेल्या नेरळ प्रादेशिक नळपाणी योजनेचे काम अत्यंत संथगतीने सुरु आहे. या नळपाणी योजनेची मुख्य उद्भव विहीर उल्हास नदी येथे सुरु असून, त्या विहिरीचे काम गेल्या सहा महिन्यांपासून बंद आहे. २०२३ मध्ये या नळपाणी योजनेचे भूमीपूजन झाले असून, डिसेंबर २०२४ मध्ये या योजनेचे काम पूर्ण करण्याचे आदेश आहेत. मात्र, या योजनेमधील बहुतेक सर्व कामे अर्धवट असल्याने नेरळकरांच्या तोंडचे पाणी पळाले आहे.



नेरळमध्ये सध्या अस्तित्वात असलेली नळपाणी योजना १९९९ मध्ये कार्यान्वित झाली आहे. त्यानंतर या योजनेची मुदत संपली असल्याने गेल्या तीन वर्षांपासून नेरळ ग्रामपंचायत हद्दीमध्ये कमी दाबाने पाणी पोहोचत आहे. त्यात नेरळ ग्रामपंचायतीमधील अनेक भागात पिण्याच्या पाण्यासाठी अनेक अडचणींना स्थानिक रहिवाशांना तोंड द्यावे लागत आहे. त्यामुळे नेरळ ग्रामपंचायतीसाठी २०२३ मध्ये ४० कोटी खर्चाची नळपाणी योजना मंजूर झाली. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणकडून राबविण्यात येत आलेल्या योजनेचे भूमीपूजन जून २०२३ मध्ये स्थानिक अमदारांनी केले होते. जुलै २०२३ ते डिसेंबर २०२४ या कालावधीत या योजनेचे काम पूर्ण करण्याचे आदेश निविदेत आहेत.

मात्र, अवघे काही महिने शिल्लक राहिलेले असताना नेरळ प्रादेशिक नळपणी योजनेचे काम पूर्णपणे ठप्प आहे. योजेनची मुख्य उद्भव विहीर उल्हास नदीवर कुंभे येथे आहे. तेथे विहीर बांधण्यासाठी खोदकाम केले आहे. मात्र, सहा महिने त्या उद्भव विहिरीचे काम बंद आहे. आता पावसाळा तोंडावर आला असून, उल्हास नदीच्या अगदी बाजूला ती विहीर बांधली जात असल्याने पुढील चार महिने पावसाळ्यात विहिरीचे बांधकाम पूर्ण करण्याची शक्यता कमी आहे.

# 'रक्षणासाठी पोलीस प्रशासन तत्पर'

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था कायम टिकून राहण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहीन. परिसरात शांततापूर्ण वातावरण अबाधित राहण्यासाठी गुन्हेगारी प्रवृत्तीला कसा आळा बसवता येईल याकडे विशेष लक्ष दिले जाईल. नागरिकांना कोणतीही अडचण किंवा काहीही तक्रार असल्यास कोणताही संकोच न बाळगता पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा. नागरिकांनी निर्भयपणे राहावे, नागरिकांच्या रक्षणासाठी पोलीस प्रशासन सदैव तत्पर आहे. महिला सुरक्षिततेच्या दृष्टीने विशेष उपाययोजना करण्यात येतील व समाजात जातीय सलोखा टिकून राहण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे प्रतिपादन उरण पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी केले.



उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सतिष निकम यांची नवी मुंबई पोलीस आयुक्तालयात बदली झाल्याने त्यांच्या जागी न्हावाशेवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांनी उरण पोलीस ठाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदाचा कार्यभार स्वीकारला. कर्तव्यदक्ष, कार्यतत्पर तसेच वेळप्रसंगी कर्तव्यकठोर अशी त्यांची पोलीस खात्यात विशेष ओळख आहे. वपोनि राजेंद्र कोते यांनी अल्पावधीतच त्यांनी विविध गुन्ह्यांचा छडा लावला असून, गुन्हेगारांचा मुसक्या आवळल्या आहेत. पोलीस खात्यात त्यांनी केलेल्या धाडसी कामगिरीबद्दल त्यांना अनेकदा गौरविण्यातही आले आहे.

# अलिबाग स्थानकातील होर्डींग धोकादायक



प्रमोद जाधव
। अलिबाग ।

अलिबाग एसटी बस स्थानकाच्या आवारात लोखंडी होर्डींग आहेत. हे होर्डींग जीर्ण अवस्थेत असून पडण्याची भिती नगरपरिषदेने व्यक्त केली आहे. मात्र, होर्डींग काढण्यास एसटी महामंडळ विभागाकडून कोणतीही हालचाल होत नसल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. त्यामुळे घाटकोपरची पुनरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. एसटी महामंडळाच्या या कारभारामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाली आहे.

रायगड जिल्हयातील आठ एसटी बस आगारात ठिकठिकाणी मोठ मोठे होर्डींग आहेत. या होर्डींगद्वारे वेगवेगळया कंपन्यांची जाहीरात केली जात आहे. अलिबाग एसटी बस स्थानकाच्या आवारातदेखील जाहीरातीचे लोखंडी होर्डींग उभारण्यात आले आहेत. याबाबत अलिबाग नगरपरिषदेच्या प्रशासनाने स्थानकात होर्डींगच पहाणी केली असता स्थानकातील होर्डींग जीर्ण झाले असून त्याला गंज लागल्याचे दिसून आले. हे होर्डींग नादुरुस्त अवस्थेत उभे असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे होर्डींग काढण्यासाठी नगरपरिषदेने एसटी बस आगार व्यवस्थापकांना लेखी पत्र दिले आहे. यावेळी घाटकोपरची पुनरावृत्ती होऊ नये म्हणून योग्य ती उपाययोजना करण्याच्या सुचना करण्यात आल्या आहेत. पंधरा दिवसांमध्ये त्याचे स्ट्रक्चरल ऑडीट करणे. तसेच, कमकूवत असल्यास ते निष्कसित करण्याची कार्यवाही करावी, असे आदेश देण्यात आले आहेत. मात्र, हे होर्डींग काढण्याबाबत कोणतीही हालचाल स्थानक प्रशासनाकडून झाली नसल्याचे दिसून आले आहे.

जिल्ह्यातगेल्याआठदिवसांपासून अवकाळी पाऊस वादळी वाऱ्यासह ठिकठिकाणी कोसळत आहे. पुन्हा वादळी वाऱ्यासह हा पाऊस पडण्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे कोणतीही हानी होऊ नये याची काळजी एसटी महामंडळाने घ्यावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

### प्रशासनाचे दुर्लक्ष; प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर

### २२ हजार प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर

अलिबाग हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. या ठिकाणी एसटी महामंडळाचे आगार व बस स्थानक आहे. मुंबई पुणेसह ग्रामीण भागात अलिबाग एसटी बस आगारातून बसेस सोडल्या जातात. या स्थानकात ७५ बसेस आहेत. एकूण ४२१ फेऱ्या असून २२ हजार हून अधिक प्रवासी एसटीतून प्रवास करत असतात. दर दिवशी २३ हजार ८०० किलो मीटरचा प्रवास होतो. मात्र, स्थानकात असलेल्या या जीर्ण झालेल्या होर्डींगमुळे २२ हजार प्रवाशांची सुरक्षा वाऱ्यावर असल्याचे बोलले जात आहे.

> स्थानकाच्या आवारात असलेल्या लोखंडी होर्डींगबाबत कार्यवाही करण्याचे लेखी पत्र नगरपरिषदेकडून आले आहे. विभाग नियंत्रक कार्यालयाकडे याबाबत कळविले असून दखल घेत पहाणी करून कार्यवाही करण्याच्या सुचना एजन्सीला दिल्या आहेत. आठ दिवसात पहाणी करून पुढील कार्यवाही करणार असल्याचे सांगण्यात आले आहे.
>
> –अजय वनारसे, आगार व्यवस्थापक, अलिबाग

> बस स्थानकाच्या आवारात मोठ मोठी होर्डींग आहेत. काही होर्डींग गंजलेल्या व नादुरुस्त अवस्थेत आहेत. घाटकोपरसारखी दुर्घटना घडू नये यासाठी पंधरा दिवसात संरचनात्मक लेखा परिक्षण करणे. तसेच, कमकूवत असल्यास निष्कसित करण्याची लेखी सुचना पाच दिवसांपूर्वी आगार प्रमुख यांना दिल्या आहेत.
>
> –अंगाई साळुंखे, मुख्याधिकारी तथा प्रशासक अलिबाग नगरपरिषद

## दरीमध्ये पडलेल्या तरुणाला जीवदान

। नेरळ । प्रतिनिधी ।

माथेरान शहरातील तरुण नेहमीप्रमाणे दरीमध्ये उतरून प्रवास करीत असताना पाय घसरून अपघात झाला. त्या अपघातानंतर माथेरानमधील पोलिसांनी सह्याद्री रेस्क्यु टीमला पाचारण केले. त्यानंतर पोलीस कर्मचारी, रेसक्यू टीम आणि स्थानिक आदिवासी तरुणांनी त्या तरुणाला सुखरूप बाहेर काढले आहे. दरम्यान, भूषण भानुदास शिंदे या तरुणाला गंभीर जखमा झाल्या असून त्याला पनवेल येथील एमजीएम रुग्णालयात दाखल केले आहे.

माथेरान शहरातील बाजारपेठ येथे आईसगोळा बनवून विकण्याचा व्यवसाय करणारा भूषण भानुदास शिंदे हा तरुण अनेकदा माधवजी पॉइंट येथील बाबा हाऊस येथून उतरून दरीमधून खंडाळा पॉईंट असा प्रवास करीत असतो. रविवारी (दि.१९) साधारण पाच वाजता त्या प्रवासात त्याचा पाय घसरला आणि आणखी खोल दरीत कोसळला. त्याबद्दल माहिती मिळताच माथेरान पोलीसांनी सह्याद्री रिस्क्यू टीम यांना मदतीसाठी बोलावून घेतले. सायंकाळी साडेसाता वाजता अथक प्रयत्नांनी दरीमध्ये पडलेल्या भूषण शिंदे याला बाहेर काढण्यात रेसक्यु टीमला यश मिळाले.

## खाडीकिनारी जलप्रदूषण वाढले



### ■ मासेमारी करणाऱ्यांना फटका

। उरण । वार्ताहर ।

उरण-पनवेलच्या विविध खाड्या व किनारपट्टीवरील जलप्रदूषण वाढले आहे. तर, दुसरीकडे मातीचा भराव करून खाडीमुख बुजविण्यात येत आहेत. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भरावामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध माश्यांच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसला आहे. या मत्स्य दुष्काळाने पारंपरिक मासेमारी करणाऱ्या व्यवसायिकांवय उपासमारीची वेळ आली आहे.

जेएनपीए बंदर व नवीमुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या माध्यमातून उरण-पनवेल परिसराचा झपाट्याने विकास होत आहे. त्यात काही भांडवलदारांनी आपला व्यवसाय उरण-पनवेल खाडीकिनाऱ्यालगत असलेल्या शेतजमिनीवर सुरू केला आहे. अशा खाडीकिनाऱ्यावरील शेतजमिनीवर दगड मातीचा भराव टाकला जात असून त्या भरावात खारफुटीचे जंगल वाढणारे पाणलोट क्षेत्रही भूजविले जात आहे. खाडीतील वाढते जलप्रदूषण आणि भरावामुळे किनाऱ्याच्या परिसरात आढळणाऱ्या विविध माश्यांच्या काही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या मच्छिमारांना याचा आर्थिक फटका बसत आहे. तरी, रायगड जिल्ह्याचे पालकमंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी किसन जावळे, मत्स्य विभागाचे अधिकारी यांनी या बाबींकडे लक्ष केंद्रित करावे, अशी मागणी पारंपरिक मासेमारी करणारे व्यावसायिक करत आहेत.

## नेरळ येथील वीज पुरवठा पूर्ववत

। नेरळ । प्रतिनिधी ।

कर्जत तालुक्यात वादळी वाऱ्याने विजेचे खांब कोसळल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. महावितरणकडून शर्थीचे प्रयत्न झाल्यानंतर पाचव्या दिवशी नसरापूर ग्रामपंचायत ह वीज पुरवठा पूर्ववत झाला आहे.

ग्रामपंचायत नसरापूर हद्दीतील कळंबोली वाडी येथे असलेल्या सब स्टेशनवरून जाणारी मुख्य वीज वाहिनी १३ मे रोजी अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याने खंडित झाली होती. येथील चिंचवली, गणेगाव, सालवड, चांधई, कळंबोली गावातील त्याच बरोबर नेरळ, कशेले, कडाव, विभागाला पोहचवली जाणारी पाच मुख्य वीज वाहिनीचे खांब, तसेच असंख्य झाडे पडल्याने वीज पुरवठा खंडित झाला होता. नेरळ, कशेळे विभागात विविध मार्गाने अडचणी सोडवून वीज पूर्ववत करण्यात आली. परंतु, काही भागात फार मोठ्या प्रमाणात अडचणी उदभवल्या आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात वीज खांब बसविणे



सहज शक्य नसल्याने तेथील वीज पुरवठा सुरळीत होण्यास अडथळा निर्माण झाले होते. १८ मुख्य वीज वाहिनी खांब आणि दोन रोहित्र पडल्याने अत्यंत अवघड परिस्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे खंडित झालेला वीजपुरवठा पूर्ववत करता येत नव्हता.

मात्र, सर्व प्रकारच्या अडचणी सोडवून सर्व विभागातील वीज पुरवठा रात्री साडेदहा वाजता पूर्ववत करण्यात यश आले. पनवेल कार्यकारी अभियंता गणेश लटपटे, कर्जतचे उप कार्यकारी अभियंता प्रकाश देवके, सहाय्यक अभियंता वैभव सिंग यांनी विविध प्रकारे नियोजन करून वीज प्रत्येक विभागाला वीज खंडित होणार नाही याची काळजी घेतली.

## भरावासाठी मातीऐवजी चिखलाचा वापर



। उरण । वार्ताहर ।

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना जेएनपीटीच्या माध्यमातून साडेबारा टक्के भूखंड वाटपासाठी भरावाचे काम सुरू आहे. भरावासाठी माती ऐवजी चिखलाचा वापर खुलेआम केला जात आहे. याची चौकशी करण्याची मागणी प्रकल्पग्रस्तांकडून जोर धरू लागली आहे. जेएनपीटी प्रकल्पग्रस्त बाधीत शेतकऱ्यांना साडेबारा टक्केचे भूखंड विकसित करून देण्याचे काम सुरू आहे. यासाठी दास्तान फाटा येथील जागेमध्ये भरावाचे काम सुरू आहे. भरावासाठी मातीचा वापर करणे बंधनकारक असतानाही ठेकेदारांनी सुरुवातीला मातीचा वापर केला आहे. त्यानंतर ठेकेदारांनी नियमांची पायमल्ली करून खुलेआम चिखलाचा व जुन्या इमारतींचा निघालेला राबीटचा भरावासाठी वापर केला जात आहे.

## गाववाड्या होणार कनेक्ट

**सुधागड-पाली :** ताडगांव ग्रामपंचायत हद्दीतील बीएसएनएल मोबाईल टॉवर बसवण्याच्या कामाची सुरुवात करण्यात आली आहे. या टॉवरमुळे ताडगाव ग्रामपंचायत हद्दीतील सर्व गावांना व वाड्यांना मोबाईलचे नेटवर्क मिळणार आहे.

## स्नेहसंमेलनातून एकटवले माजी विद्यार्थी

### जेएसएम महाविद्यालयातील जून्या आठवणींना उजाळा

। अलिबाग । प्रतिनिधी ।

अलिबागमधील जेएसएम महाविद्यालयातील २००१ मधील टीवाय बीएच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहसंमेलन रविवारी (दि.१९) कुरुळ येथे उत्साहात पार पडला. यावेळी महाविद्यालयातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. या स्नेहसंमेलनातून २३ वर्षांनी माजी विद्यार्थी एकटवल्याचे चित्र पहावयास मिळाले.



जेएसएम महाविद्यालयात टीवायबीए पदवी शिक्षण पुर्ण झाल्यावर काही विद्यार्थी संसारात रमले, काही विद्यार्थी पुढील शिक्षणात तर काही विद्यार्थी नोकरी व्यवसायात गुंतले. त्यामुळे अनेकांचा संपर्क तुटला होता. मोजकेच मित्रमंडळींची भेट होत असतं. टीवायबीए वर्गातील सर्व विद्यार्थी एकत्र आले पाहिजे ही संकल्पना रसिक काळे यांनी मनात आणली. सोशल मिडीयाच्या माध्यमातून सर्वजण हळुहळू एकत्र आले. त्यांचा एक ग्रुप तयार झाला. त्यानंतर स्नेहसंमेलनातून एकत्र येण्याचा निर्णय घेतला. गेल्या चार वर्षापासून सर्व माजी विद्यार्थी स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून एकत्र येत आहेत.

याही वर्षी स्नेहसंमेलन कुरुळ येथे आयोजित करण्यात आला. सकाळी सर्व माजी विद्यार्थी जमले. एकमेकांची विचारपूस यावेळी करत प्रत्येकजण काय करीत आहेत, याची माहिती दिली. प्रत्येकाने आपआपले मत व्यक्त केले. त्यानंतर वेगवेगळे खेळ खेळण्यात आले. एक वेगळा उत्साह या निमित्ताने माजी विद्यार्थ्यांमध्ये दिसून आला.















## लढाई संपणार नाही

महाराष्ट्रातले मतदान काल संपले. निकालाला पंधरा दिवस बाकी आहेत. त्यामुळे रोज जी राजकीय शिवीगाळ चालू होती त्यातून राज्यातील जनतेची सुटका होईल. विरोधकांनी उपस्थित केलेल्या कोणत्याही प्रश्नांना भाजपने उत्तरे दिली नाहीत. प्रचाराच्या ऐन आरंभी निवडणूक रोख्यांची भानगड बाहेर आली. सर्वोच्च न्यायालयाने ही योजना बेकायदा ठरवली. तरीही नरेंद्र मोदी आणि भाजप त्याचे समर्थन करीत राहिले. ज्यांना इडी लावली किंवा ज्यांना परवानग्या हव्या होत्या अशा उद्योगांकडून भाजपला हजारो कोटींचे रोखे मिळाले. याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले नाही. हा भ्रष्टाचार त्यांनी हसत हसत पचवला. त्यानंतर महागाई व बेकारीचा प्रश्न पुढे आला. पण मोदींनी त्याला बगल दिली. काँग्रेसचा जाहीरनामा मुस्लिम लीगसारखा असल्याची हाकाटी सुरू केली. नंतर त्यांनी अधिकाधिक खालची पातळी गाठली. प्रचारात विरोधकांवर अनेक हलकट आरोप केले गेले. महाराष्ट्रात उद्धव ठाकरे यांना नकली संतान आणि शरद पवार यांना भटकता आत्मा म्हटले गेले. राज्यात यंदा भीषण उन्हाळा व पाणीटंचाई आहे. चारा डेपो नसल्याने चाऱ्याचा प्रश्न गंभीर आहे. सोयाबीनचे भाव पडले असल्याने मराठवाडा व विदर्भातील लाखो शेतकरी कुटुंबांना फटका बसला आहे. कांदा, कापूस, ऊस यांच्याही अशाच वेगवेगळ्या कहाण्या आहेत. रायगड, रत्नागिरी, कोल्हापूर इत्यादी जिल्ह्यांमध्ये लोकांचा विरोध चिरडला जातो आहे. जबरदस्तीने उद्योग प्रकल्प लादले जात आहेत. याला विरोध केला तर विकास-विरोधी ठरवले जात आहे. कोकणातल्या मुंबई-गोवा मार्गाला कोणीही विरोध केलेला नाही. गेल्या वर्षी गणपतीच्या आत एक मार्ग आणि डिसेंबरच्या आता संपूर्ण मार्ग पूर्ण होईल असे रवीन्द्र चव्हाण म्हणाले होते. आता चव्हाण गायब आहेत आणि रस्ता आहे तसाच आहे. या रस्त्याला कोणीही विरोध केलेला नाही. तरीही तो का पूर्ण होत नाही याचे उत्तर दिले जात नाही.

### आकडेवारीचा घोळ संशयास्पद

मोदी आणि भाजपने प्रचारात असे काही विष कालवले की जनतेच्या या प्रश्नांबाबत चर्चा करणे अशक्य झाले. मोदींचे कायम हिंदू-मुस्लिम चालू होते. काँग्रेस तुमचे आरक्षण आणि संपत्ती पळवून मुस्लिमांना देणार आहे असे ते सांगत होते. मागे याच स्तंभात म्हटल्याप्रमाणे उद्या एमआयएम सत्तेत आली तरीही तिला हे करणे शक्य नाही. काँग्रेसने तर याचा उच्चारही कोठे केला नव्हता. तरीही मोदींनी हा आरोप केल्यानंतर त्याचा प्रतिवाद करणे विरोधकांना भाग पडले. दुसरीकडे ऐन निवडणुकांमध्येच आम आदमी पक्ष किंवा झारखंड मुक्ती मोर्चाच्या मंत्री व आमदारांविरुध्द पोलिसी कारवाया चालू राहिल्या. असा प्रकार पूर्वी कधीही झाला नव्हता. निवडणूक आयोगाची भूमिकाही अत्यंत पक्षपाती होती. मोदींची मुस्लिमांबाबतची वक्तव्ये अत्यंत आक्षेपार्ह व खोटारडी होती. त्यावरून मोदींना भाषणे करायला बंदीच करायला हवी होती. पण मोदींनीच नेमलेले आयोगाचे सदस्य तेवढी हिंमत दाखवणे शक्य नव्हते. त्यांनी मोदींऐवजी भाजपला नोटीस काढली. असे पूर्वी कधीही झाले नव्हते. बरे, इतके करूनही त्या नोटिसीचे पुढे काय झाले याचा आजतागायत खुलासा झालेला नाही. मतदानाच्या टक्केवारीबाबतही आयोगाचे वागणे संशयास्पद आहे. पूर्वी मतदान झाल्यानंतर चोवीस तासांच्या आता प्रत्यक्ष किती जणांनी मतदान केले हे जाहीर केले जात असे. यंदा प्रथमच केवळ टक्केवारी दिली गेली. लोकसभेचा मतदारसंघ पंधरा किंवा वीस लाखांचा असतो. त्यातील नेमक्या किती जणांनी मतदान केले हे न सांगता अमुक टक्के मतदान झाले असे सांगितले गेले. आठ-दहा दिवसांनंतर या मतदानात सहा टक्क्यांनी वाढ झाली असे सांगितले गेले. काही ठिकाणी ही वाढ दहा टक्केदेखील झाल्याचे दिसते. वास्तविक मतदानयंत्रांमुळे मतदान नेमके किती झाले याची बेरीज दोन-तीन तासात करता यायला हवी. चार-आठ दिवसांनी ही नेमकी आकडेवारी जाहीर होते हे सर्वच संशयास्पद आहे.

### पोखरलेल्या यंत्रणा

सर्वोच्च न्यायालयात याबाबत याचिका दाखल आहे. न्यायालयाने निवडणूक आयोगाला नोटिसा काढल्या आहेत. तिथे काय तो फैसला होईलच. पण एकूणच आयोगाच्या भूमिकेबाबतचा संशय फिटणारा नाही. आयोगाने शंकेला तसूभरही जागा राहणार नाही अशा रीतीने कारभार करायला हवा. प्रत्यक्षात आयोगाचा कारभार हम करेसो कायदा या धर्तीचा आहे. सात टप्प्यात आणि जवळपास तीन महिने चालणारी निवडणूक घेणे हेही आयोगाचे यश नव्हे तर अपयश म्हणूनच गणले जायला हवे. आता मतदान संपल्यांनंतर तरी किमान महाराष्ट्रातील सर्व राजकीय नेत्यांनी याबाबत आवाज उठवायला हवा. एकूण चार जूनला निकाल काहीही लागले तरी इंडिया आघाडीची लढाई संपणार नाही. उलट निकालानंतर ती खऱ्या अर्थाने सुरु होईल. मोदींच्या भाजपने सर्व सरकारी नोकरशाही, निवडणूक आयोगासारख्या स्वायत्त यंत्रणांवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे वा त्यांना आतून पोखरले आहे. अलिकडेच न्यूजक्लिक या डिजिटल पुत्रिकेचे संपादक प्रबीर पुरकायस्थ यांची अटक सर्वोच्च न्यायालयाने बेकायदा ठरवली. चीनकडून पैसे घेऊन देशात मोदीविरोधी प्रचार केल्याचा त्यांच्यावर आरोप होता. मात्र त्यांच्यावरचे नेमके आरोप काय हे त्यांना अटक होताना सांगितलेच गेले नव्हते. त्यांच्या वकिलांनाही हजर राहू दिले नाही. याबाबत जी घाई केली गेली ती पाहून पुरकायस्थ यांना पोलिस कोठडी सुनावण्याचा दंडाधिकाऱ्यांचा निर्णय बेकायदा होता असे सर्वोच्च न्यायालयाने म्हटले. खालची न्यायालये सरकारला हव्या त्या पध्दतीने निर्णय करीत असल्याचे हे पहिलेच उदाहरण नव्हे. या स्थितीत चार जूननंतर इंडिया आघाडीला समजा सत्ता मिळाली नाही तरीही हुकुमशाहीविरुध्दचा संघर्ष चालू ठेवावा लागेल. त्यासाठी जनता त्यांना पुरेसे बळ देईल अशी आशा आहे. महाराष्ट्रातील निकाल भाजपच्या विरोधात गेले तर पुढच्या दोन महिन्यात विरोधी पक्षांमध्ये आणखी फोडाफोडी केली जाईल. इडीचा बेमुर्वत वापर त्यासाठी होईल. सत्तारुढ नेते अधिक चवताळल्यासारखे वागतील. या तोंड देण्यासाठी विरोधक व जनता या दोहोंनाही सज्ज राहावे लागणार आहे.

विचार

# पाकव्याप्त काश्मीर तापले; भारताकडे नजर!

**दोनशे रुपये लिटर दूध, पैसे मोजूनही न मिळणारे पीठ, जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, वाढलेले वीजदर यामुळे पाकव्याप्त काश्मीरमधील सामान्यांपुढे जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच दहशतवादीही सरकार विरोधात लढा देऊ लागले आहेत. पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानविरोधात सूर उमटत असून उघडपणे भारतात सामील होण्याची भाषा बोलली जात आहे. नेमके काय घडतेय पाकव्याप्त काश्मीरमध्ये?**

**प्रा.डॉ. विजयकुमार पोटे**

भारतात लोकशाहीच्या मतोत्सवात पाकिस्तानचा मुद्दा वारंवार चर्चिला जात आहे. गेल्या पाच वर्षांमध्ये पाकिस्तानची वाताहात झाली आहे. तिथल्या महागाईने जनतेचे जीणे हराम करून टाकले आहे. भारताविरोधात भावना भडकावून पोट भरत नाही, हे तिथल्या शासनकर्त्यांनाही आता कळून चुकले आहे. दोनशे रुपयांहून अधिक दराने घ्यावे लागत असलेले दूध, पैसे मोजूनही न मिळणारे पीठ आणि जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा, त्यात कर्जासाठीच्या अटीमुळे देशात वाढवावे लागलेले वीजदर यामुळे सामान्यांपुढे जगण्या-मरण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यातच दहशतवाद पोसण्यासाठी पूर्वी करत असलेल्या खर्चावर निर्बंध आल्याने दहशतवादीही तिथल्या सरकारविरोधात लढा द्यायला लागले आहेत. तालिबानी दहशतवाद्यांचा नंगानाच सुरू आहे. बॉंबस्फोट आणि आत्मघाती हल्ल्यांना सामोरे जात पाकिस्तानला आता दहशतवाद्यांना आश्रय दिल्याची किंमत मोजावी लागते आहे. त्यातच पुलवामा हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानशी व्यापारी संबंध तोडल्यामुळे पाकमधील नागरिकांना आता स्वस्तात मिळणाऱ्या जीवनावश्यक वस्तू मिळत नाहीत.

हलाखीच्या आर्थिक स्थितीमुळे पाकिस्तानच्या चलनाला काडीचीही किंमत राहिलेली नाही. परदेशातील गुंतवणूक थांबली आहे. सरकारच्या धोरणामुळे उद्योजक नव्याने जोखीम पत्कारायला तयार नाहीत. संपूर्ण पाकमधील जनता महागाई आणि जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईने तसेच वीजबिलातील वाढीमुळे त्रस्त आहे. एकीकडे गेल्या पाच वर्षांमध्ये भारतातील नेते वारंवार पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेण्याची भाषा करत असताना पाकव्याप्त काश्मीर आणि बलुचिस्तान प्रांतात पाकिस्तानविरोधात सूर उमटू लागले आहेत. बंडखोरीची भाषा बोलली जात आहे. काहींनी तर उघडपणे भारतात सामील होण्याची तयारी दाखवली आहे.

पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेणे किंवा तिथे बंड होऊन त्यांनी भारतात सामील होणे हे नक्कीच तितकेसे सोपे नाही. पाकव्याप्त काश्मीरमध्ये (पीओके) सध्या युद्धसदृश स्थिती आहे. पाकिस्तानच्या अत्याचाराविरुद्ध काश्मिरी जनतेने बंद पुकारले आहे. लोक रस्त्यावर उतरून पाकिस्तानचा निषेध करत आहेत. संतप्त जनता पाकिस्तानी सैन्याच्या गोळ्यांनाही घाबरत नाही. आंदोलक आणि पाकिस्तानी सुरक्षा दलांमध्ये अनेक ठिकाणी चकमक झाली आहे. त्यात एक उपनिरीक्षक ठार झाला, तर अनेक आंदोलक ठार आणि जखमी झाले. या आंदोलनामुळे पाकिस्तान सरकार हतबल झाले आहे. पाकिस्तानचे अध्यक्ष आसिफ अली झरदारी यांनी तिथल्या परिस्थितीवर विचारविनिमय करण्यासाठी राष्ट्रपती भवनात तातडीची बैठक बोलावली आहे. पाकव्याप्त जम्मू आणि काश्मीरमधील तणाव कमी करण्यासाठी उपाय शोधण्यासाठी सर्व संबंधितांना सहकार्य करण्याचे आवाहन केले आहे. अलिकडेच जम्मू-काश्मीर संयुक्त अवामी कृती समितीच्या आवाहनावर हजारो आंदोलक रस्त्यावर उतरले. यादरम्यान पाकिस्तानी सैन्याने आंदोलकांना रोखण्याचा प्रयत्न केला. त्यानंतर अनेक ठिकाणी हिंसक चकमक झाली. अनेक भागांमधून हिंसाचाराची विदारक चित्रे समोर आली.

'तहरीक-ए-तालिबान पाकिस्तान' या अतिरेकी संघटनेने पाकिस्तान विरोधात मोर्चा काढणाऱ्या लोकांना पाठिंबा दिला आहे. पाकिस्तानी लष्कराविरुद्ध युद्ध पुकारणाऱ्या 'टीटीपी'ने एक निवेदन जारी करून म्हटले आहे की पाकिस्तान प्रशासित काश्मीरमध्ये करमुक्त वीज आणि गहू अनुदानाची मागणी करणाऱ्या आंदोलकांना 'तेहरिक-ए-तालिबान' पूर्ण पाठिंबा देत आहे. काश्मिरींना पाकिस्तानी लष्कराविरुद्ध सशस्त्र लढा सुरू करण्याचे आवाहन करताना 'पाकिस्तानी लष्कराला केवळ ताकदीची भाषा कळते' असे या दहशतवादी संघटनेने म्हटले आहे. पाकिस्तानचे म
ाजी पंतप्रधान आणि भारताविरुद्ध विष ओकणाऱ्या इम्रान खान यांच्या पक्षानेही पाकव्याप्त काश्मीरमधील आंदोलकांची छळवणूक आणि हिंसाचाराचा निषेध केला आहे आणि ते अस्वीकार्य असल्याचे म्हटले आहे. काश्मीरमधून कलम ३७० हटवल्यापासून पाकव्याप्त काश्मीर चर्चेत आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी नुकतेच सांगितले होते की आता पाकिस्तानशी फक्त पाकव्याप्त काश्मीरबाबत चर्चा होईल. त्याच वेळी पंतप्रधान कार्यालयातील मंत्री जितेंद्र सिंह यांनीही आता पाकव्याप्त काश्मीर मुक्त करण्याची आणि त्याचा भारतात समावेश करण्याची वेळ आली आहे, असे म्हटले.

दोन दिवसांपूर्वी सुब्रमण्यम स्वामी यांनीही ट्विट केले होते की पंडित जवाहरलाल नेहरू यांनी संयुक्त राष्ट्रात दाखल केलेला प्रस्ताव मागे घेऊन लष्कर पाकव्याप्त काश्मीर ताब्यात घेऊ शकते. राजकीय नेते काहीही म्हणत असले, तरी पाकव्याप्त काश्मीर खरेच पाकिस्तानच्या तावडीतून इतक्या सहजासहजी मुक्त होऊ शकते का? प्रस्ताव मागे घेऊन पाकव्याप्त काश्मीर मिळवता आला असता तर यापूर्वी पाकिस्तानशी झालेल्या युद्धानंतर ते मिळवता आले असते, असे माजी लष्करप्रमुख जनरल दीपक कपूर सांगतात. याचा अर्थ त्यातील गुंतागुत लक्षात घ्यावी. हा मुद्दा भारत आणि पाकिस्तानमधील आहे.

संयुक्त राष्ट्राचा याच्याशी काहीही संबंध नाही. सिमला करारानुसार दोन्ही देशांना हा प्रश्न सोडवावा लागेल. पाकव्याप्त काश्मीर मिळवण्याचा एकमेव मार्ग म्हणजे युद्ध आणि तेही भयंकर युद्ध. त्यासाठी आपली क्षमता वाढवावी लागेल. सध्याच्या ताकदीपेक्षा आपल्याला अधिक मजबूत व्हावे लागेल. सध्या भारत सर्वात बलवान आहे. सरकार सक्षम असून कठोर निर्णय घेऊ शकते. भारताचा काही भाग पाकिस्तान आणि चीनने लष्करी बळावर बळकावला होता. लष्करी बळावरच आपण ते परत मिळवू शकतो.

यामध्ये कोणत्याही प्रकारचे कायदेशीर बंधन नाही; परंतु जागतिक बहिष्काराची किंमत मोजण्याची तयारी ठेवावी लागेल. पाकव्याप्त काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे, हे खरे आहे. पाकिस्तानने भारताचा काही भाग बळकावला आहे हे ही खरे; पण तो परत आणण्याचा मार्ग संयुक्त राष्ट्रसंघाला सापडणार नाही. संयुक्त राष्ट्रात गेले तरी १९४७ मध्ये दाखल केलेल्या ठरावात पाकव्याप्त काश्मीर परत मिळवण्यासाठी सार्वमत घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. ते आपल्यासाठी योग्य नाही. बालाकोट एअर स्ट्राईकच्या निमित्ताने आपल्यावर हल्ला झाला तर चोख प्रत्युत्तर तर देऊच; पण कुरापत काढणाऱ्याला मुळापासून नष्ट करू, असा संकेत आपण दिला आहे. आता आपल्याला दहशतवाद्यांना नियंत्रण रेषा ओलांडण्यापासून रोखायचे आहे. जम्मू-काश्मीरमधून कलम ३७० हटवण्यात आल्याने तेथील परिस्थिती सामान्य होण्यास वेळ लागेल. पहिले लक्ष तिथल्या लोकांवर, विशेषतः खोऱ्यातील लोकांवर द्यायला हवे. कलम ३७० हटवणे फायदेशीर आहे, हे तिथल्या लोकांना समजेल आणि भारत सरकार आणि लष्कर त्यांच्या सुरक्षेसाठी आणि चांगल्या भविष्यासाठी काम करत आहे, हे लक्षात येईल तेव्हा पुढचा मार्ग आपोआप सुकर होईल. त्यानंतर पाकिस्तानी सैन्याला तिथून हुसकावून लावावे लागेल.

पाकिस्तानमधील अलीकडील निदर्शने आणि त्या निदर्शनांमधील हिंसक दडपशाही दर्शवते की पाकिस्तानची या प्रदेशावरील पकड कमी होत आहे. मुझफ्फराबाद आणि रावळकोटमधील स्थानिक लोक आणि अधिकारी यांच्यातील संघर्ष याची साक्ष देतात. रावळकोटमध्ये भारतात विलीनीकरणाची मागणी करणारी पोस्टर्स लागली. आंदोलकांवर अश्रूधुराच्या नळकांड्या फोडण्यात आल्यानंतर पाकव्याप्त जम्मू-काश्मीरमधील संतप्त रहिवाशांनी पोलिस अधिकाऱ्यांचा निषेध केला. एका अधिकाऱ्याने सांगितले की, पाकिस्तान पाकव्याप्त काश्मीरवरील पकड गमावत आहे आणि हा मुलुख भारताचा एक भाग बनण्याच्या जवळ जात आहे.

दोन अल्पवयीन मुलींच्या मृत्यूमुळे येथे निदर्शने झाली. दहा जिल्ह्यांमध्ये आंदोलने झाली. त्यामुळे काश्मिरींशी पाकिस्तानची पोकळ एकता उघड झाली आहे. पाकव्याप्त काश्मीर हे सध्या पाकिस्तानसाठी एक दुखणे बनले आहे. परिस्थिती इतकी वाईट आहे की लोक पाकिस्तानी निमलष्करी दल आणि पोलिसांचा पाठलाग करून मारत आहेत. दरम्यान, बलुचिस्तानमध्येही तणाव वाढला आहे. बलुच नेता आणि सामाजिक कार्यकर्ता, आंदोलक मेहरंग बलोच यांनी ग्वादर बंदर शहराच्या कुंपणाला विरोध करण्याची शपथ घेतली आहे. कोणत्याही परिस्थितीत आमची जमीन आणि समुद्र परकीयांच्या स्वाधीन करणार नाही आणि असा कोणताही प्रकल्प यशस्वी होऊ देणार नाही, असा इशारा त्यांनी दिला. विकास आणि सुरक्षेच्या नावाखाली ग्वादरला कुंपण घालण्याच्या आणि चीनच्या ताब्यात देण्याच्या योजनेच्या विरोधात आपण रान उठवू, असा इशारा त्यांनी दिला आहे.

आजकाल

# थकित कर्जाची दुसरी लाट येण्याचा धोका

**संजीव चांदोरकर**

आपण म्हणत आहोत कोट्यवधी कुटुंबाचे अनेक भौतिक प्रश्न आहेत. महागाई, बेरोजगारी, शेती अरिष्ट, छोटे उद्योग बंद पडणे. असे आसून देखील कोठेही असंतोषाचा भडका उडाला आहे असे दिसत नाही त्याचे सिक्रेट काय आहे?

अनेक दशके बॉटम ऑफ पिरॅमिड मधील कोट्यवधी कुटुंबांना औपचारिक बंकिग आणि वित्तक्षेत्राने गावकुसाबाहेर ठेवले होते. पण विशेषतः गेल्या दहा वर्षांत या गरिबांना कर्जे देण्याची त्यांच्यात अहमहमिका लागली आहे. शेकडो बँका आणि वित्तसंस्था यात उतरत आहेत. तांत्रिक दृष्ट्या हा निर्णय त्या त्या बँकेच्या, वित्त्संस्थेच्या व्यवस्थापनाचा असतो. मान्य. पण ज्यावेळी एकाच वेळी शेकडो बँका, वित्तसंस्था गरिबांना एकच एक निर्णय घेऊ लागतात तो काही योगायोग नक्कीच नसतो. त्यावेळी त्याची मुळे व्यवस्थेत शोधावी लागतात. तो राजकिय अर्थव्यवस्थेच्या नेत्यांचा निर्णय असतो. सार्वजनिक बँका, खाजगी बँका, स्मॉल फायनान्स, सहकारी बँका, पतपेढी, मायक्रो फायनान्स, एन बी एफ सी, गोल्ड लोन, क्रेडिट कार्ड, डिजिटल लेंडिग, पियर टू पीयर, उत्पादक कंपन्यांच्या ग्राहकांसाठी हप्त्याच्या योजना. बाय नाऊ पे लेटर, विना तारण, विना कारण कर्जे.

नाना प्रकारच्या कर्ज संस्था अक्षरशः लाखो कोटी रुपयांची कर्जे देऊ लागली आहेत. मायक्रो फायनान्स क्षेत्राच्या काही उपक्षेत्रांची, २०२३ अखेरीपर्यंतची, आकडेवारी खाली दिली आहे. (सर्व आकडे



राउंड ऑफ केले आहेत; प्रत्यक्षात कमीजास्त असू शकतात; फक्त त्या त्या क्षेत्राचे आकारमान कळावे एवढाच माफक उद्देश आहे)

मुद्रा योजना : लाभार्थी : ४६ कोटी ; मुद्रा योजना एकूण कर्ज वाटप : २३ लाख कोटी रुपये.

पंतप्रधान जनधन योजना अंतर्गत उघडलेली खाती: ५० कोटी

बिझिनेस कॉरस्पॉण्डेण्टस : २० लाख

क्रेडिट काड्‌र्स : १० कोटी

मायक्रो फायनान्स: लोन अकाउंट्स : १३ कोटी ;

मायक्रो फायनान्स स्त्रिया कर्जदार : ७ कोटी ;

मायक्रो फायनान्स : लोन पोर्टफोलिओ: १३ लाख कोटी रुपये

गोल्ड लोन कंपन्या : लोन पोर्टफोलिओ: ५ लाख कोटी रुपये

यात अजून भर घालता येईल. अणि खाजगी सावकार, ज्यांची आकडेवारी कोणाकडे उपलब्ध असू शकत नाही. पण ती देखील काही लाख कोटी रुपयांत आहे. कोणालाही कितीही मुक्त हस्ते कर्ज उपलब्ध करून दिले तरी त्या कर्जाची व्याजासकट परतफेड व्हावी लागते. त्यासाठी कर्ज घेणाऱ्याला स्वतःची उत्पंनाची साधने असावी लागतात.

नाहीतर बँकिंग, वित्त क्षेत्रात अरिष्ट येऊ शकते आणि ते आर्थिक अरिष्ट बनू शकते. १०० कोटी लोकसंख्येला अशीच कर्ज वाटप होत राहिले. अणि त्या जोडीला त्यांना पुरेशी उत्पन्नाची साधने दिली नाहीत तर थकीत कर्जाची दुसरी लाट या छोट्या, रिटेल कर्ज क्षेत्रातून उठू शकते. आता हे कॉमन सेन्सिकल तत्व काय या धोरण कर्त्यांना कळत नसेल ? तरी देखील प्रणाली असे का वागते? कार्पोरेट लोन घेताना कट देतात, पण गरीब काही लाच देऊ शकत नाहीत ना? विचार करूया.

लोकसंसद

### मनाला हुरहुर लावणारी गोष्ट

गेली ८६ वर्षे युनायटेड किंगडममध्ये नियमितपणे प्रकाशित होणारे 'रीडर्स डायजेस्ट' हे मासिक आता बंद होणार आहे. आरोग्य, सत्यकथा, मते, तथ्ये, काल्पनिक कथा, पाककृती, आर्थिक सल्ला आणि इतर अनेक गोष्टींच्या माहितीचा खजिना उपलब्ध करून वाचकांच्या मनावर गारूड केलेल्या 'रीडर्स डायजेस्ट'च्या बंद होण्यामुळे नियतकालिक प्रकाशन व्यवसायातील एक युग संपल्याची भावना जगभरच्या वाचकांमध्ये निर्माण झाली आहे. १९२२ मध्ये अमेरिकेतील न्यूयॉर्कमध्ये सामान्यांचे कौटुंबिक मासिक म्हणून प्रस्थापित झालेल्या रीडर्स डायजेस्टने १६ वर्षांनंतर १९३८ मध्ये पहिल्यांदाच यूकेमध्ये आपले मासिक प्रकाशित केले होते. त्यानंतर या मासिकाने तेथे लोकप्रियतेचे नवनवीन उच्चांक गाठले. केवळ युनायटेड किंगडमच नव्हे तर जगभरातील ब्रेलसह अनेक भाषांमध्ये हे मासिक प्रकाशित होऊ लागले. एके काळी भारतासह अनेक देशांमध्ये ते सर्वाधिक खपाचे मासिक ठरले होते. इतके की 'रीडर्स डायजेस्ट'च्या जगभरातल्या वाचकांची संख्या त्या काळात तब्बल १५ कोटीपर्यंत पोहोचली होती. सध्याच्या आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात मुद्रण प्रकाशन व्यवसाय करणे आर्थिक दृष्ट्या परवडणारे नसल्यामुळे हा कटु निर्णय घ्यावा लागत असल्याचे मासिकाच्या व्यवस्थापनाकडून सांगण्यात आले. बंद होण्याची कारणे काहीही असोत, 'रीडर्स डायजेस्ट'च्या वाचकांसाठी ही मनाला हुरहुर लावणारी गोष्ट आहे.

**- प्रदीप शंकर मोरे,** अंधेरी

## मराठी साहित्यिक दिनविशेष

**२१ मे**

**१८७९:-** कवी मनोहर तथा मनोहर कृष्ण गोळवलकर यांचा जन्म. व्यवसायाने वकील. कवितेचा विषय आधुनिक पण रचना मात्र जुन्या वळणाची, असे त्यांच्या कवितेचे स्वरुप. **१८९४:-** प्रवासवर्णनकार लेखक मोरेश्वर गोपाळ काळे यांचा जन्म. 'काश्मिर', 'म्हैसूर', 'हिमालयाची यात्रा' येथील प्रवासावर त्यांची पुस्तके प्रसिध्द झाली. **१८९७:-** लेखक, बालसाहित्यिक आणि लहान मुलांसाठी त्या काळात अत्यंत लोकप्रिय असणाऱ्या 'खेळगडी' या मासिकाचे संपादक काशीनाथ रावजी पालवणकर यांचा जन्म. पालवणकर लोकमान्य, मनोरंजन, मौज आदी नियतकालिकांत काम करत असताना मुलांसाठी मासिक काढायची योजना आखली. त्यानुसार 'हिंदकुमारी' हे मासिक सुरु केले. पण ते फार काळ चालले नाही. ही उणीव त्यांनी आपले बंधू बा. रा. पालवणकर जे महाडमधून 'खेळगडी' हे मासिक चालवत, त्याच्या प्रकाशनाची जबाबदारी घेतली. या मासिकातून त्यांनी लहान मुलांसाठीचा पुष्कळसा मजकूर स्वतः लिहित. पालवणकरांनी 'नदीकाठच्या गोष्टी', 'टेकडीवरच्या गोष्टी', 'तिस्मरखा सोबती', 'गच्चीवरच्या गोष्टी' अशी अनेक पुस्तके त्यांनी लहान मुलांसाठी लिहिली. इसापनीतिचा अनुवादही त्यांच्याच नावावर आहे. आधुनिक मराठी बालसाहित्याच्या प्रारंभीच्या जडणघडणीत पालवणकरांचे योगदान फार मोठे आहे. **१९१०:-** लेखक, इतिहासाचे अभ्यासक, ऐतिहासिक वस्तुंचे संग्राहक, लक्ष्मण महादेव भिडे गुरुजी यांचा जन्म. ह्यांच्या ग्रंथसंपदेत 'जामखेडच्या परिसरात', 'रामेश्वर दर्शन', 'विठ्ठल मंदिर जामखेड' आणि 'हरी नारायण स्वामी' यांचे चरित्र अशी ग्रंथ संपदा. **१९१८:-** कोशकार नीळकंठ बाबाजी रानडे यांचे निधन. १८ वर्षे अथम परिश्रम करून दोन हजार पृष्ठांचा इग्रंजी मराठी शब्दकोश त्यांनी लिहिला. या शब्दकोशाला लो. टिळकांची प्रस्तावना लाभली. **१९१८:-** नाट्यलेखनात ठसा उमटवणाऱ्या लाडकोजीराव कृष्णाजीराव आयरे यांचा जन्म. ह्यांचे 'अमरत्याग', 'ईर्षा', 'कसोटी', 'जया अंगी मोठेपण', 'जुलूम', 'नवसाची गोष्ट', 'निर्धार', 'फिर्याद', 'मायेचा संसार', 'मंगलदिव्य', 'वडील माणसं', 'स्वराज्य' अशी नाट्यसंपदा. **१९२१:-** 'पुस्तक पंढरी', 'बालसाहित्य जत्रा' ह्या मासिकांचे संपादक, ग्रंथविक्रेते पांडुरंग नागेश कुमठा यांचा जन्म. **१९२३:-** मराठी साहित्याचे जाणकार आणि मॅजेस्टिक प्रकाशनचे केशव विष्णू कोठावळे यांचा जन्म. **१९२६:-** कवी गणेश दामोदर कुडे यांचा जन्म. 'आभाळाचं रात', 'तापी तीर' हे काव्यसंग्रह आणि काही बालगीते त्यांची प्रसिध्द झाली. **१९२८:-** कथा-कादंबरीकार व समीक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णी यांचा जन्म. चित्र-शिल्प, चित्रपट आणि नाटके यांच्या समीक्षेला वाङ्‌मयाच्या जाणकारांपेक्षा निराळे ज्ञान आवश्यक असते. हे त्यांनी 'पिकासो', 'हिचकॉक', 'अश्वत्थामाची सळसळ' आदी पुस्तकांतून दाखवून दिले. **१९४९:-** समीक्षक, पत्रकार वासुदेव वामन फडणवीस यांचे निधन. ह्यांचे लेखन 'वागीश्वरी', 'सावधान', 'प्रतिभा' आदी नियतकालिका तून प्रसिध्द. मोजकेच पण लक्ष-वेधन असे त्यांचे लेखन असे. याची प्रचिती 'विचार विलास' व 'सुशीलेचा देव' ह्या वा. भ. जोशी यांच्या पुस्तकावरील तसेच या. मु. पाठक ह्यांच्या 'शशिमोहन' या खंडकाव्यावरील त्यांच्या चिकित्सक समीक्षेवरुन लक्षात येते. 'केळकरांचे अद्वितीयत्व', 'लोकमान्यांचे राजकारण' ह्या अभ्यासपूर्ण लेखांप्रमाणे त्यांच्या व्यक्ति विषयक लेखांचे 'व्यक्तिविशेष' हे पुस्तक. 'वागीश्वरीचा वीणाझंकार' हे राजकीय विषयावर भाष्य असणारे सदरही त्यांनी चालविले होते. **१९५१:-** 'योग' या विषयावर देश परदेशातील वृपत्रातून लेखन करणारे लेखक, प्रशिक्षक, संशोधक प्राचार्य डॉ. मनोहर लक्ष्मण घरोटे यांचा जन्म. यांनी सामान्यांसाठी योगविषयक माहिती देणारा 'योगिक प्रक्रियांचे मार्गदर्शन' हा ग्रंथ लिहिला. तसेच 'सचित्र शालेय योगाभ्यासक्रम' हे शालेय पाठ्यपुस्तकही लिहिले. **१९५५:-** लेखक, मुक्त पत्रकार अविनाश विष्णूपंत पाठक यांचा जन्म. 'दाहक वास्तव', 'मागोवा धटिकांचा', 'काव्यप्रवाहांच्या वळणा वरुन' हे वैचारिक लेखसंग्रह. 'पूर्णांक सुखाचा' ही लघुकादंबरी आणि 'मर्मस्पर्श', 'मराठी वाङ्‌मय व्यवहार', 'चिंतन आणि चिंता' ह्या संपादित साहित्यासह 'रामटेकच्या गडावरुन' हे त्यांचे आणखी एक महत्वपूर्ण पुस्तक. **१९५७:-** बेने इस्त्रायली धर्माच्या 'एस्तेर राज्ञी चरित्र', व 'दानिएलचे मानसिक धैर्य', या (मराठी) कीर्तनसंहितांचे लेखक सॉलोमन शालोम आपटेकर यांचे निधन. तीन धार्मिक नाटकेही लिहून त्यांनी या धर्माला मराठीचा साज दिला. संगीत दानियल संगीत योसेफ ही त्यांची संगीत नाटक तत्कालिन मराठी रंगभुमीवरील व पौरोणिक स्वरूपाची नाटके आहेत. **१९७२:-** वैद्य-कीर्तनकार डॉ.संत पितांबर विठोबाजी मरहाडे यांचा जन्म. 'अनुभव सागर' हा अभंगसंग्रह प्रकाशित झाला आहे. **१९८१:-** धार्मिक विषयांवरील पुस्तकांचे लेखन करणारे संजय रामजी राखडे यांचा जन्म. यांच्या ग्रंथसंपदेत 'सद्गुरु महिमा' आणि 'सद्गरु भक्ती यशाची वाटचाल' अशी ग्रंथसंपदा. **२०२३:-** संत साहित्याचे गाढे अभ्यासक, समीक्षक डॉ. किशोर प्रल्हादराव सानप यांचे निधन. दै. महाराष्ट्र टाइम्समध्ये 'सगुण निर्गुण', 'माझे अध्यात्म' ही त्यांची सदरे लोकप्रिय झाली होती.

**- संजय वझरेकर**
**९९७५५७६६७५**

## अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे

२१ मे

१) श्रीम.विजया पुरूषोत्तम लिमकर
पंतनगर, अलिबाग
२१-०५-१९४४

२) श्री. श्रीनिवास दामोदर मसाळ
विद्यानगर, अलिबाग
२१-०५-१९४७

३) श्री.यल्लाप्पा नरसिंह पाटील
पंतनगर, अलिबाग
२१-०५-१९५०

# सर्वसामान्यांचे आधारवड : सुरेश खैरे


**शिक्षण, सहकार, राजकारण, क्रीडा, सामाजिक या विविध क्षेत्रात कर्तृत्वाने छाप टाकणारे, अजातशत्रू, सर्वसामान्यांचे अधारवड, तरुणांचे आयडॉल म्हणून ओळखले जाणारे रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे उपाध्यक्ष, शेकापचे नेते सुरेश खैरे यांचा आज वाढदिवस आहे. यानिमित्ताने त्यांच्या कार्याचा घेतलेला आढावा...**

**प्रमोद जाधव**

सुधागड तालुका म्हटले की, दुर्गम भाग, या परिसरात आदिवासी समाजासह अन्य समाजातील नागरिक गुण्या गोविंदाने राहत आहेत. येथील गावे, वाड्यांचा विकास साधण्यामध्ये सुरेश खैरे यांचा सिंहाचा वाटा आहे, हे बोलणे वावगे ठरणार नाही. सुधागडमधील विकासाच्या दृष्टीकोनातून सर्वसमावेशक विचार करून त्यांनी तालुक्यातील कानाकोपऱ्यात, दुर्गम भागात वाड्या वस्त्यांमध्ये विविध विकास कामांची गंगा पोहचवली आहे.

रायगड जिल्हा परिषद सदस्य म्हणून काम करीत असताना सुधागड तालुक्यातील विविध प्रश्न मांडून त्यांची सोडवणूक करण्यासाठी प्रशासनाकडे त्यांनी कायमच पाठपुरावा केला आहे. स्वभावाने शांत पण जनतेच्या हितासाठी आक्रमक भुमिका घेणारे नेते म्हणून त्यांची एक वेगळी ओळख आहे.

जिल्हा परिषदेच्या जलसंधारण समितीचे सदस्य म्हणून काम करीत असताना सुधागडमधील पाण्याचा प्रश्न कायमचा मार्गी लावण्यासाठी जलयुक्त शिवार योजना राबवून त्याचा जनतेसाठी कसा फायदा होईल याकडे त्यांनी लक्ष दिले. दुरदृष्टी असणारे, सर्वसामान्यांच्या समस्या ओळखून त्या मार्गी लावण्यामध्ये त्यांचा एक वेगळा हातखंडा आहे.





राजकारण, समाजकारण, शैक्षणिक क्षेत्रात काम करताना सहकार क्षेत्रातदेखील त्यांचे योगदान मोलाचे राहिले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे सरचिटणीस, रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष आ. जयंत पाटील यांनी सहकार क्षेत्राची जबाबदारी त्यांच्या खांद्यावर दिली. बँकेचे उपाध्यक्ष म्हणून ती जबाबदारी खैरे यांनी खंबीरपणे पार सांभाळली. राज्य सहकारी संघाचे संचालक तसेच पश्चिम महाराष्ट्र सहकार मंडळाचे संचालक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. सुधागडमध्ये शेतकरी कामगार पक्षाचा झेंडा फडकवत ठेवण्यामध्ये खैरे यांचे मोलाचे योगदान राहिले आहे. तरुणांसह सर्व घटकांपर्यंत पक्षाची ध्येय धोरणे त्यांनी पोहचविण्याचा प्रयत्न केला आहे. समाजकारण करीत असताना राजकारणातदेखील त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. प्रशासनावर त्यांची एक वेगळी पक्कड आहे. एखादे काम त्यांनी हाती घेतले, तर ते मार्गी लावल्याशिवाय ते कधीच गप्प बसले नाहीत.

प्रत्येक विषयाचा परिपूर्ण अभ्यास करण्याची अफाट क्षमता सुरेश खैरे यांच्यामध्ये आहे. शिक्षण, आरोग्य, महिला सशक्तीकरण, अशा अनेक कार्यांमध्ये त्यांनी स्वतःला वाहून घेतले आहे. शेतकरी कामगार पक्षाचे नेते आ. जयंत पाटील यांच्याकडून मिळालेली खंबीर साथ, कार्यकर्त्यांचे प्रेम यामुळे सुधागडच्या आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रामध्ये त्यांचे अष्टपैलू काम राहिले आहे.

गावागावात कार्यकर्ते निर्माण करण्यामध्येदेखील त्यांचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे. कार्यकर्ता घडला पाहिजे. त्यांना गावांतील, वाड्या वस्त्यांमधील समस्या समजली पाहिजे. त्या समस्यांचे निराकरण करण्यामध्ये सहभाग राहिला पाहिजे. यासाठी ते नेहमी प्रयत्नशील राहिले आहेत. आपली बांधिलकी सर्वसामान्य जनतेशी, गोरगरीबांशी आहे, त्यांना केंद्र बिंदू ठेवून काम करा, हा उपदेश कार्यकर्त्यांना ते नेहमीत देत आहेत.

नुकताच कृषीवल मार्फत हळदीकुंकू समारंभ पाली येथे पार पाडला. या सोहळ्याला हजारोच्या संख्येने महिला सहभागी झाल्या होत्या. येथील कार्यकर्त्यांनीदेखील हा कार्यक्रम उत्साहात साजरा व्हावा यासाठी प्रचंड मेहनत घेतल्याचे दिसून आले. सुरेश खैरे यांच्या एका शब्दावर शेकडो कार्यकर्ते हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सरसावले होते. त्यामुळे सुधागडमध्ये त्यांचे एक वेगळे वलय असल्याचे दिसून आले. सुरेश खैरे यांना वाढदिवसानिमित्त खूप शुभेच्छा.

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

## चौलमध्ये महाकाली मातेचा उत्सव

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

त्वष्टा कासार समाज बांधवाचे श्रध्दा व भक्ती असलेल्या चौल बेलाई येथील प्राचीन महाकाली मंदिर चौल येथे वार्षिक यात्रा महोत्सव मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला.



त्वष्टा कासार ज्ञाती संस्थान, रेवदंडा यांच्या वतीने रविवार, दि. १९ मे रोजी चौल दक्षिण भागातील कालिका टाकीनजीक महाकाली मंदिरात वार्षिक यात्रा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. त्यानिमित्ताने सकाळी ९ वाजता चंद्रकांत दांडेकर यांचे रेवदंडा निवासस्थानाहून पालखी सोहळा, सकाळी ११ वाजता देवीची महापूजा व वाडी भरणे सोहळा, ११.३० वाजता हळदीकुंकू व पाहुण्यांचा ओळख परिचय व सत्कार कार्यक्रम, दुपारी १ वाजता देवीची आरती व महाप्रसाद, दुपारी २ ते ५ पर्यंत स्थानिक महिलांचे कार्यक्रम, सायकांळी ५.३० ते ७.०० पर्यंत महाकाली भजन मंडळ रेवदंडाचा भजनाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमास पूजेचा मान ठाणे येथील उद्योजक अभिषेक पोरे व नेहा पोरे यांना देण्यात आला होता. या उत्सवानिमित्त रेवदंडा, चौल विभागासह संपूर्ण रागयड जिल्ह्यातील व ठाणे, मुंबई आदी शहरांतील विखुरलेला त्वष्टा कासार समाज बांधव व भगिनी यांनी महाकाली मातेचा वार्षिक उत्सवात सहभाग घेतला होता. या उत्सवासाठी त्वष्टा कासार समाजाच्या वतीने अध्यक्ष ऋषी वडके, कार्यवाह गणेश वडके, खजिनदार अमोल वडके, सदस्य ओमकार वडके, सदस्य प्रशांत वडके, सल्लागार शंकर वडगे, मंगेश वडके तसेच समस्त त्वष्टा कासार कार्यकर्ते व महाकाली महिला मंडळ, रेवदंडा यांनी परिश्रम घेतले.

## सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांची सभा

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्हा परिषद सेवानिवृत्त कर्मचारी संघटनाची सभा १६ मे रोजी सकाळी अलिबाग येथे संघटना अध्यक्ष जी.एच. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. त्यावेळी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

या सभेत सेवानिवृत्त कर्मचारी यांचा अलिबाग ठिकाणी मेळावा घेण्यात यावा. हा मेळावा जून २४ अखेर तिसऱ्या, चौथ्या आठवड्यात घ्यावा. प्रत्येक तालुक्यातील सेवा निवृत्त कर्मचारी यांनी सहभाग घ्यावा. तालुक्यातील कर्मचारी उपस्थित राहण्याची जबाबदारी जे सदस्य ग्रुपवर कार्यरत असतात, त्यांच्याकडे जबाबदारी सोपावावी. येणाऱ्या सदस्यांची सोय व्यवस्थित होत आहे की नाही याकरिता पदाधिकारी यांनी एक शिष्टमंडळ नेमावे. मेळाव्यामध्ये जिल्हा परिषदेमधून सेवानिवृत्त झालेले कर्मचारी हे सामाजिक, राजकीय सेवा करत असल्यास त्यांना आमंत्रित करावे. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, कॅफो इ. आमंत्रित करावे. कर्मचारी प्रलंबित प्रश्नांकरिता पेन्शन अदालत बोलाविण्याकरिता सीईओंना पत्र देणे, प्रलंबित प्रश्न ज्या कर्मचाऱ्यांचा आहे, त्यांनी सीईओ, एचओडी यांना दिलेल्या पत्राची प्रत संघटनेस देणे. कॅफोंना ऑनलाईन प्रणालीकरिता आवश्यक असणारी माहिती देण्यासाठी पंचायत समितीबरोबर संपर्क साधणे, आदी बाबींबाबत चर्चा करण्यात आली. या सभेस जी.एच. पाटील, डी.जी. मानकर, ए.बी. पाटील, सुरेश म्हात्रे, किशोर घरत, प्रकाश म्हात्रे, आय. के. दळवी, डॉ. राजू म्हात्रे, डॉ. रवी पाटील, प्रवीण पितळे, श्रीमती सदावर्ते, राणे, भोपी, विजय म्हात्रेंसह पदाधिकारी, सदस्य उपस्थित होते.

## नामदेव मरवडे यांचे निधन

**खांब :** तळवली तर्फे अष्टमी या गावचे रहिवासी तथा पुजारी नामदेव मरवडे यांनहा अल्पशा आजाराने उपचारादरम्यान देवाज्ञा झाली. मृत्यूसमयी ते सुमारे ७० वर्षांचे होते.



समाजातील विविध क्षेत्रातील मान्यवर मंडळींनी अंत्यदर्शन घेतले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, तीन मुलगे, सुना, पुतणे, पुतण्या, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्यांचे दशक्रियाविधी मंगळवारी (दि.२८) तर उत्तर कार्य विधी शुक्रवारी (दि.३१) त्यांच्या निवासस्थानी होणार असल्याची माहिती कुटुंबियांकडून देण्यात आली आहे.

## मेंढपाळ लागले परतीच्या प्रवासाला

### पावसाची चाहूल लागताच धरली घरची वाट

**। पाताळगंगा । वार्ताहर ।**

गेले आठ महिने खडतर प्रवास करीत असताना पावसाची चाहूल लागली की प्रत्येक मेंढपाळ आपल्या मायभूमीकडे प्रस्थान करीत असतात. कारण, घाटमाथ्यावर चार महिने या मेंढ्यांना मोठ्या प्रमाणात चारा उपलब्ध होत असतो. परंतु, पाऊस शांत झाला की पुन्हा एकदा हा धनगर समाज आपल्याजवळील असलेला लावाजवा घेऊन कोकणात येत असतात.



साधारण दिवाळी सणामध्ये या मेंढपाळांचे कोकणात आगमन होत असते. पावसाळ्यात विविध प्रकारची काटेरी वनस्पती निर्माण होत असते. यामुळे त्यांच्या चाऱ्यांचा प्रश्न मार्गी लागत असतो. कोकणात आल्यानंतर मेंढपाळांचा प्रपंच आज इथे तर उद्या तिथे ऑक्टोबर ते मे-जूनदरम्यान उघड्यावरच असतो. सुमारे २५० ते ३०० किलोमीटर मेंढपाळांना चाऱ्यासाठी भटकंती करावी लागते.

दरम्यान, पाऊस पडू लागल्याचे चिन्ह निर्माण होत असल्यामुळे मेंढपाळ मेंढ्यांचा कळप घेऊन आपल्या घरी परतीची वाट धरू लागले आहेत. पाऊस उशिरा पडला किंवा पावसाने दडी मारली तर मेंढपाळांचा मुक्काम वाढत असतो.

## माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उत्साहात



**। मुरूड -जंजिरा । वार्ताहर।**

श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालय यशवंत नगर नांदगाव हायस्कूलमधील इयत्ता दहावीमध्ये सन १९८०-८१ या शैक्षणिक वर्षात असणाऱ्या माजी शालेय विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन नांदगाव येथील दुर्वा सी बीच रिसॉर्ट येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी या बॅचमधील विद्यार्थी एकत्र झाले होते. यावेळी प्रत्येक विद्यार्थ्याने जुन्या आठवणींना उजाळा देत शालेय दिनाच्या आठवणी उजागर केल्या.

कार्यक्रमाची सुरुवात ईशस्तवनाने भरत घोसाळकर यांनी केली. स्वागत गीत नरेंद्र चोरघे व महाराष्ट्र गीत सदानंद मुंबईकर यांनी सादर केले. प्रास्ताविक स्वागत अनंत कमाने यांनी केले. १२ दिवंगत माजी विद्यार्थी मित्र व मैत्रिणींना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. ४४ वर्षांनी भेट होत असल्याने उपस्थित मित्र व मैत्रिणींमध्ये उत्साह आणि आनंद ओसंडून वाहात होता. अशा कार्यक्रमांनी प्रत्येकाला जगण्याची संजीवनी प्राप्त होईल, आयुष्यमान वाढेल, असे मनोगतात अनंत कमाने यांनी सांगितले. सर्व विषय व शिक्षकांची सांगड घालत नरेंद्र चोरघे यांनी सुंदर गीत रचना सादर केली.

मंजुम मुल्ला उपसरपंच झाल्याबद्दल, रवींद्र विरकुड एसटी महामंडळातून सेवानिवृत्त झाल्याने व रमेश दिवेकर हे सरपंच असताना ग्रामपंचायतीमध्ये उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल दिल्ली येथे राष्ट्रपती डॉ. कलाम यांच्या हस्ते सत्कार झाला याबद्दल तसेच कृष्णा अंबाजी यांची सह जीवन विद्या मंडळ पंचक्रोशीत संचालक म्हणून निवड झाल्याबद्दल या सर्वांचे शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

## वादळात घराचे मोठे नुकसान

**। सुतारवाडी । वार्ताहर ।**

रायगडात मागील चार दिवसांपासून अवकाळी दाणादाण उडवून दिली आहे. शुक्रवारी झालेला अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्यांमुळे जावटे येथील पांडुरंग सखाराम शेपोंडे यांच्या घरावरील सर्वच्या सर्व पत्रे घराच्या बाजूला उडून पडले. यात त्यांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले. सायंकाळी अचानकपणे वादळी वाऱ्यासह कोसळणाऱ्या पावसामुळे ग्रामीण भागामध्ये अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे. पांडुरंग शेपोंडे यांच्या घराचे पत्रे जमिनीवर कोसळले. नशिबाने कोणी घराबाहेर अंगणात नव्हते, नाहीतर मोठा अनर्थ घडला असता.



## अमली पदार्थ बाळगणारे अटक

**। रसायनी । वार्ताहर ।**

गोरेगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत नशाकारक व अमली पदार्थ बाळगल्याप्रकरणी दोघांना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सपोनि संदीप पोमन व पथक यांना गोपनीय बातमीदाराद्वारे खात्रीशीर बातमी मिळाली की, समीर अब्दुलकलाम शेकदरे (३८), दानिश रफिक फनसोकर (३०) दोघेही रा. शेखाडी, ता. श्रीवर्धन, जि रायगड हे दोघे चरस हा अमली पदार्थ विक्रीकरिता घेऊन येणार आहेत. त्यानुसार पोलिसांनी म्हसाळ गोरेगाव रोडवरती गोरेगाव दर्गा येथे नाकाबंदी करुन त्यांना पकडले. त्यांच्याकडून पाच लाख सतरा हजारांचा १.३७ किलो ग्रॅम चरस, ९५ हजार रुपये किमतीची लाल काळ्या रंगाची टीव्हीएस कंपनीची मोटारसायकल असा एकूण सहा लाख बारा हजारांचा मुद्देमाल जप्त केला.

## उबाठा शिवसेनेच्या पदाधिकारांच्या नियुक्त्या जाहीर

**। रेवदंडा । वार्ताहर ।**

अलिबाग तालुक्यातील चौल उबाठा शिवसेनेत नवीन पदाधिकारांच्या नियुक्ता जाहीर करण्यात आल्या असून, चौल उपविभाग प्रमुखपदी शैलेश घरत, तर शाखाप्रमुखपदी राजेंद्र गुरव यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



अलिबाग येथील उबाठा शिवसेना मध्यवर्ती कार्यालयात नियुक्तीपत्र प्रदान कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी ३२ रायगड लोकसभेचे उमेदवार व माजी केंद्रीय मंत्री अनंत गीते, शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शिवसेना अलिबाग तालुका प्रमुख शंकर गुरव, चौल शिवसेना विभाग प्रमुख मारूती भगत, चौल ग्रा. पं. माजी उपसरपंच अजित गुरव, माजी सदस्य अजित मिसाळ आदी उपस्थित होते.

नव्याने नियुक्ती झालेले चौल उपविभाग प्रमुखपदी शैलेश घरत, तर शाखाप्रमुखपदी राजेंद्र गुरव यांचे शंकर गुरव यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## हवामान बदलाचा उन्हाळी भातशेतीला फटका

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

ढगाळ हवामान व कडक उन्हामुळे तालुक्यातील रब्बी हंगामातील भातशेती कापणीवर संकट आले असून, शेतकरी चिंतित झाले आहेत.

तालुक्यात साधारणतः ८०० हेक्टर जागेवर रब्बी हंगामातील भातशेतीचे पीक घेण्यात आले आहे. सलग चौथ्या वर्षी शेतकऱ्यांना बिघडलेले हवामान, अवकाळी पाऊस व वादळ यांचा सामना करावा लागत असून, शेतीचे मोठे नुकसान होत आहे. उन्हाळी भातशेती कापणीस तयार झाली आहे. तालुक्यात शेतकऱ्यांनी भातशेती कापण्यास सुरुवात केली आहे. गेल्या काही दिवसांपासून तापमानात वाढ झाली आहे, तसेच पाऊस, ढगाळ वातावरणामुळे भातशेती कापणीवर संकट आले आहे. कडक उन्हामुळे कापणीस आलेली भातशेती करपण्याचा धोका निर्माण झाला असून, ढगाळ वातावरणामुळे व अवकाळीमुळे शेतीचे नुकसान होत असून, शेतकरी हवालदिल झाले आहेत. तालुक्यात शेतीकामासाठी मजूरकरांचा तुटवडा असून, वाढलेली मजुरी परवडत नसल्याने कापणी करताना अनेक अडचणी येत असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.



### शेतीचे मोठे नुकसान, शेतकरी हवालदिल

## मच्छी विक्रेत्यांची दाणादाण

**। पाली । वार्ताहर ।**

सुधागड तालुक्यासह पाली शहरात अवकाळी पावसासह आलेल्या वादळाने तालुक्यातील अनेक नागरिकांच्या घरांचे छप्पर उडविले, तसेच पाली शहरातील पाली-खोपोली मार्गावर असणाऱ्या मच्छी विक्रेत्यांच्या छपरांची दाणादाण उडवून टाकली. मात्र, त्यांनी शासनाच्या नुकसान भरपाईची वाट न पाहता उन्हापासून वाचण्यासाठी नुकसान झालेले छप्पर स्वखर्चाने लागलीच तयार केले.




## पेटारवाडीमध्ये तीव्र पाणीटंचाई

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

खांडस ग्रुप ग्रामपंचायतीमधील पेटारवाडीमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाली आहे. तेथील पाण्याची विहीर आटली असून, त्या विहिरीमध्ये शासनाच्या टँकरमधून पाणी टाकण्यात येत आहे. मात्र, तेथील आदिवासी बांधवांना धुणीभांडी करण्यासाठी मोठी उतरण उतरून चिल्हर नदीवर जावे लागत आहे.

पेटारवाडी आदिवासीवाडी असून, या वाडीसाठी कोणतीही नळपाणी योजना नाही. तेथे वाडीच्या खालील भागात असलेल्या विहिरीमधून पाणी उचलून पाणी आणायचे काम येथील आदिवासी बांधवांना करावे लागते. त्यात यावर्षी मार्च महिन्यातच विहीर आटली आणि पेटारवाडीतील आदिवासी बांधवांचे तोंडचे पाणी पळाले. परिणामी, त्यांना पाण्यासाठी चिल्हर नदीवर जावे लागत आहे. खांडस ग्रामपंचायतीकडून पंचायत समितीकडे टँकरची मागणी करणारा प्रस्ताव केल्यानंतर पंचायत समितीकडून पाण्याचा टँकर सुरु करण्यात आला आहे. पाण्याचा टँकर वाडीच्या खालील बाजूस उतारावर असलेल्या विहिरीमध्ये ओतण्यात येतो आणि तेथे वाडीमधील महिला पाणी आणण्यासाठी जात असतात. पंचायत समितीचा टँकर वेळेवर येत असल्याने ग्रामस्थांची तहान भागली आहे.



## अवकाळीने मोडले कंबरडे

### वीटभट्टी व्यावसायिक, आंबा बागायतदारांचे नुकसान



**। खांब । वार्ताहर ।**

अवकाळी पावसाने सर्वच क्षेत्रांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, वीटभट्टी व आंबा बागायतदारांना अवकाळीचा मोठा फटका सहन करावा लागला आहे.

मागील आठवड्यात सलग तीन दिवस रात्री-अपरात्री या पावसाने हजेरी लावून साऱ्यांचीच तारांबळ उडवून दिली. याचा फटका उन्हाळी हंगामात भातशेती पिकविणाऱ्या शेतकरीवर्गाला बसला असल्याने त्यांच्या चेहऱ्यावरही नाराजी दिसून येत आहे. तर, वीटभट्टी मालक व आंबा बागायतदारांनाही याचा मोठा फटका बसला असल्याचे पाहावयास मिळत आहे. आंबे पिकण्याच्या हंगामात व कच्च्या वीट तयार होऊन भट्टीत भाजण्याच्या वेळेलाच अवकाळी पावसाने मुहूर्त साधल्याने आंबा बागायतदार व वीटभट्टी व्यावसायिकांना याचा मोठा फटका बसला असल्याने भविष्यातील रोजीरोटीची समस्या निर्माण झाली आहे.

# विकासाला आमचा विरोध नाही

## अतुल म्हात्रे यांचे प्रतिपादन



। पेण । प्रतिनिधी ।

आमचा विकासाला अजिबात विरोध नाही; परंतु विकास जर भूमीपुत्रांच्या छाताडावर बसून होत असेल, तर आम्हाला ते कदापि मान्य नाही, असे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते अतुल म्हात्रे यांनी शासनास ठणकावून सांगितले. प्रकल्पाच्या माध्यमातून विकास होत असताना येथील भूमीपुत्र शेतकऱ्यांना केंद्रस्थानी ठेवावे आणि या विकासाचे भागीदार म्हणून येथील भूमीपुत्रांना सामावून घ्यावे, असेही म्हात्रे म्हणाले. रायगड जिल्ह्यामध्ये होऊ घातलेल्या एमएमआरडीए प्रकल्पामध्ये उरण, खोपटा तसेच पेणमधील एकूण १२४ गावांचा समावेश करण्यात आला आहे. त्यातील पेण येथील सार्वजनिक विद्या मंदिर येथे तालुक्यातील शेतकऱ्यांची बैठक संपन्न झाली. त्यावेळेला शेतकऱ्यांशी म्हात्रे यांनी संवाद साधला.

घेतील. दिवसाला एकाच वेळी २,००० हरकतदारांना बोलावू शकतील, त्यामुळे या शासनाला आपल्या हरकती विचाराधीन घ्यायच्याच नाहीत असंच दिसतेय. अतुल म्हात्रे यांनी जमलेल्या शेतकऱ्यांना चित्रफितीद्वारे एमएमआरडीए प्रकल्प समजावून सांगितले आणि शेवटी लढाईला

अतुल म्हात्रे, कायदेतज्ज्ञ ॲड. सुरेश ठाकूर, बांधकाम व्यावसायिक शहाजी पाटील, सामाजिक कार्यकर्ते अरूण शिवकर, माजी सभापती महादेव दिवेकर, पी.डी. पाटील, दिलीप पाटील, शेखर शेळके आदींसह शेकडो भूमीपुत्र शेतकरी उपस्थित होते.

### शेतकऱ्यांनो, संघटित व्हा : पाटील

यावेळी विकासक शहाजी पाटील यांनी शेतकऱ्यांनी संघटित होण्याचे आवाहन केले. ते म्हणाले की, १०० एकर जमिनीचा एक प्रोजेक्ट केल्यास शेतकऱ्याला ४० टक्के विकसित भूभाग मिळणार आहे. परंतु, स्वतंत्रपणे जमीन शासनाला दिल्यास फक्त १२.५ टक्के विकसित भूभाग मिळेल आणि शासन स्वतंत्र जमिनी देतात म्हणून वाढीव १० टक्के विकसित भूभाग देतील. म्हणजेच, तुम्हाला २२.५ टक्के विकसित भूखंड मिळेल. मात्र, यामध्ये १७.५ टक्क्याला तुम्ही मुकणार आहात, याचाही विचार करणे गरजेचे आहे. त्यामुळे आता शेतकऱ्यांनी शासनाविरूद्ध आक्रमक होणे गरजेचे आहे, अन्यथा हे शासनकर्ते शेतकऱ्यांवर अन्याय केल्याशिवाय राहणार नाहीत.

# खारीतील तलावाचे खोलीकरण

## रवींद्र घरत यांच्या हस्ते कामाचा शुभारंभ



। चौल । प्रतिनिधी ।

अलिबाग तालुक्यातील चौलमळा गावच्या खारीतील तलावाचे खोलीकरण आणि साफसफाईच्या कामाचा शुभारंभ रविवारी गावचे प्रमुख रवींद्र घरत यांच्या हस्ते नारळ वाढवून करण्यात आला. यावेळी उपप्रमुख जितेंद्र पाटील यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अलिबागपासून साधारण १२ किलोमीटर अंतरावर अलिबाग-रेवदंडा मुख्य रस्त्यालगत चौलमळा गाव आहे. गावातील कोणतेही काम हे ग्रामस्थांच्या एकीतूनच केले जाते. त्याचाच प्रत्यय पुन्हा एकदा आहे. दरवर्षी खारीतील तलावात गौरी-गणपतीचे विसर्जन केले जाते. परंतु, सभोवताली असणाऱ्या खाडीतील पाण्याच्या प्रवाहामुळे हा तलाव माती व अन्य कचरा येऊन भरला होता. दरम्यान, आगामी गणेशोत्सव काळात ग्रामस्थांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये, यासाठी रवींद्र घरत यांच्या अध्यक्षतेखातील तलावाचे खोलीकरण आणि साफसफाई करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार रविवारी पोकलेनच्या सहाय्याने तलाव खोलीकरण करण्याचे काम हात घेण्यात आले. यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी तलाव परिसरातील वाढलेली झाडीझुडपे व अन्य कचरा साफ करुन त्याची योग्य विल्हेवाट लावली. सकाळी आठ वाजल्यापासून ग्रामस्थांनी स्वच्छता मोहीम हाती घेत अवघ्या काही तासातच हा तलाव परिसर चकाचक केला.

# राडारोड्यामुळे कांदळवन संकटात



- आक्षी पुलाखाली राडारोडा, कचऱ्याचे ढीग
- वनविभाग, ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष

। चौल । प्रतिनिधी ।

आक्षी पुलाशेजारी खाडीकिनारी टाकण्यात येणाऱ्या राडारोड्यामुळे कांदळवने संकटात आली आहेत. याठिकाणी मोठ्या प्रमाणात कांदळवन असून, परिसरातून मोठ्या प्रमाणात राडारोडा कांदळवन क्षेत्रात आणून टाकला जात असून, काही प्रमाणात कचरादेखील टाकला जात आहे. त्यामुळे कांदळवनात असणारी तिवरांची व खारफुटीची झाडा धोका निर्माण झाला आहे. संबंधित वनविभाग आणि ग्रामपंचायत प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे राडारोडा आणि कचरा टाकणाऱ्यांचे फावले आहे.

आक्षी पुलावरुन आक्षी, नागाव तसेच पुढे रेवदंडा, मुरुड आदी पर्यटनस्थळांकडे जाण्याचा मार्ग आहे. त्यामुळे रस्त्यावरुन स्थानिकांसह पर्यटकांची वर्दळ सुरू असते. आक्षी पुलाच्या खाली रस्त्यावर मोठ मोठे राडारोड्याचे आणि कचऱ्याचे ढीग साचले असून, या भागात दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे येथून ये-जा करणाऱ्या लोकांना याचा त्रास सहन करावा लागत आहे. नागरिकांच्या आरोग्यास ढीग साठल्यामुळे धोका उद्भवू शकतो याची जाणीव तरी संबंधित अधिकाऱ्यांना होणे आवश्यक आहे.

याप्रश्नी कृषीवलने वेळोवेळी आवाज उठवला आहे. परंतु, ज्या हद्दीत हा परिसर येतो, ते ग्रामपंचायत प्रशासन आणि संबंधित वनविभाग यांच्याकडून अद्याप कोणतीही ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही. येथील कचऱ्याचा प्रश्न, त्यावर उपाययोजना याबाबत वर्षभरापूर्वीसुद्धा संबंधित विभागाला विचारण्यात आला होता. परंतु, काहीच उपाययोजना करण्यात आलेली नाही, हे याठिकाणची परिस्थिती पाहिल्यावर लक्षात येते. दरम्यान, याप्रश्नी वनविभागाच्या अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु तो होऊ शकला नाही.




मुरूड-गारंबी रस्त्यालगत गुलमोहोराची झाडे बहरली असून, लाल फुलांचा सडा रस्त्यावर पडलेला दिसतो. हे मनमोहक दृश्य पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहे. (छायाचित्र : सुधीर नाझरे)




# सासवणे डी.एड.च्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन

। अलिबाग । प्रतिनिधी ।

मांडला इथे निसर्गरम्य परिसरात पिंगळे सिटीच्या ग्रीन किंग रिसॉर्टमध्ये सासवने डी. एड. कॉलेजच्या माजी विद्यार्थ्यांचे स्नेहसंमेलन उषा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात संपन्न झाले.

प्रारंभी दीप प्रज्वलन झाले. वि.कृ. म्हात्रे यांच्या टीमने महाराष्ट्र गीत सादर केले. सुरेखा वालेकर यांनी सगळ्यांचे स्वागत केले. ग.सी. म्हात्रे यांनी प्रास्ताविक केले. उपस्थित सर्व भगिनी बांधवांनी आपापले अनुभव कथन केले. शेखर पिंगळे यांचा बासरी वादनाचा कार्यक्रम प्रत्येकाच्या मनावर मोहिनी घालून गेला, तर मारुती बागडे यांनी सादर केलेले कॅसिओवादन सर्वांना आनंदाच्या शिखरावर घेऊन गेले.

जीवनात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या कैलास पिंगळे, मारुती बागडे, ग.सी. म्हात्रे, शंकर सवादकर, दि.रा. पाटील यांना शाल व गुलाबपुष्प देऊन गौरविण्यात आले.

स्नेहसंमेलनाच्या दुसऱ्या सत्रात शोभना पाटील यांच्या टीमने आरोग्य तपासणी केली. डॉक्टर मंथन व अमित पाटील याने सर्वांना आरोग्याच्या टिप्स दिल्या. आहार कधी कोणते घ्यावे, याबाबत मार्गदर्शन केले. त्यानंतर संध्याकाळी फणसाड धरणावर पर्यटन करुन नैसर्गिक सौंदर्याचा मनमुराद आनंद लुटला. रात्री समूह भोजन पार पडले. मनोरंजनाचे कार्यक्रम झाले. कुणी कविता सादर केल्या, तर कुणी आपल्या महाविद्यालयीन जीवनाच्या आठवणींना उजाळा दिला. रमेश तांडेल यांनी बनवलेल्या सुग्रास भोजनाचा स्वाद घेतला. भा.य. पाटील यांनी आभार मानले.

ज्ञानेश्वर गावंड, बाबासाहेब ठोंबरे, जावळे, प्रदीप केणी, रमेश पाटील या सर्वांनी स्नेहसंमेलन यशस्वी व्हावे म्हणून परिश्रम घेतले.

# ‘कोकण ज्ञानपीठ’चा पदवी प्रदान समारंभ



। नेरळ । प्रतिनिधी ।

कोकण ज्ञानपीठ कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन अथक प्रयत्न करून आपापले कौशल्य दाखवीत २०२२-२३ च्या परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा पदवीदान समारंभ आयोजित केला होता.

कोकण ज्ञानपीठ कॉलेजचे प्रिन्सिपल डॉ. विलास पिल्लेवान यांच्या प्रमुख उपस्थितीत पदवी प्रदान सोहळ्याचे आयोजन कॉलेजच्या सेमिनार हॉल येथे करण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून गौतम भट्टाचार्य यांची उपस्थिती होती. यावेळी एकूण १९० विद्यार्थी हे उत्तीर्ण झाले असून, १६० विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रासह पदवी प्रदान करून गौरविण्यात आले.

यावेळी कॉम्प्युटर इंजिनियरिंगच्या ७१, मॅकेनिकल इंजिनिअरींगच्या ५३, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशनच्या चार आणि इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजीच्या ६२ विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

कॉम्प्युटर इंजिनिअरिंग विभागात प्रथम आलेले आनंद पानमंद, दिव्या रौले, अदिती सिंग, मॅकेनिकल इंजिनिअरींग विभागात प्रथम क्रमांक मयूर पवार, द्वितीय क्रमांक देवेश पोकळे, द्वितीय क्रमांक साहिल निकम, तृतीय क्रमांक किरण कालेकर, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्युनिकेशन विभागाच्या मनीष वाजगे, पौर्णिमा मोकल, यश राजेंद्र, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी विभागात प्रथम क्रमांक मेघराज लोट, द्वितीय क्रमांक मंगेश उभरे, तृतीय क्रमांक किरण शिंदे, तृतीय क्रमांक कृतिका खराट आदी विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

यावेळी प्रमुख पाहुणे गौतम भट्टाचार्य, सिनियर प्राचार्य आर्किटेक्ट जेन पॅक्ट इंडिया लिमिटेड, झुलकरनैन दाभिया, डॉ. विलास पिल्लेवान, प्राचार्य कोकण ज्ञानपीठ अभियांत्रिकी महाविद्यालय, प्रो. संजय पाटील, विभागप्रमुख कॉम्प्युटर इंजिनिअरिंग, प्रो. अनुप कुंटे, विभागप्रमुख इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, प्रो. प्रवीण देशपांडे, विभागप्रमुख मेकॅनिकल इंजिनिअरिंग, प्रो. गिरीश दाखवे, विभागप्रमुख इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलीकम्यूनिकेशन, प्रो. दिपाली केसकर सायन्स अँड ह्युमॅनीटी आदी मान्यवर उपस्थित होते.



# कीर्तनकार वामन म्हस्केंचा सन्मान

। माणगाव । प्रतिनिधी ।

माणगाव तालुक्यातील मुगवली गावचे सुपुत्र तथा प्रवचन व कीर्तनकार वामन म्हस्के यांना आविष्कार फाऊंडेशन या सेवाभावी संस्थेतर्फे राज्यस्तरीय महाराष्ट्र रत्न गौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पन्हाळगड येथे जागतिक न्यूरो सर्जन डॉ. संतोष प्रभू, संस्थेचे अध्यक्ष संजय पवार यांचा हस्ते विचारे यांना सन्मानित करण्यात आले. पुरस्कार मिळाल्याबद्दल वामन मस्के यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या पुरस्कार सोहळ्याला फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष पत्रकार संजय पवार, राज्य पुरस्कार निवड समिती सदस्य माधुरी सावंत, फाऊंडेशनचे रायगड जिल्हाध्यक्ष शंकर शिंदे, रायगड जिल्हा कार्याध्यक्ष किशोर मोहिते आदी मान्यवर उपस्थित होते.

# नरेश विचारे यांना ‘महाराष्ट्ररत्न’



। म्हसळा । वार्ताहर ।

अविष्कार फाउंडेशनतर्फे क्रीडा, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांना दिला जाणारा यंदाचा राज्यस्तरीय ‘महाराष्ट्ररत्न’ गौरव पुरस्कार म्हसळा तालुक्यातील शिक्षण विभागात काम करणाऱ्या नरेश विचारे यांना प्रदान करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर भवन, पन्हाळगड येथे जागतिक न्यूरो सर्जन डॉ. संतोष प्रभू, संस्थेचे अध्यक्ष संजय पवार यांचा हस्ते विचारे यांना सन्मानित करण्यात आले. यावेळी तंत्र शिक्षक संतोष चव्हाण, पदवीधर विभाग शिक्षक किशोर मोहिते उपस्थित होते. नरेश विचारे यांना पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तापमानवाढीमुळे कासव संवर्धन मोहीम

। अलिबाग । वार्ताहर ।

तापमानवाढीमुळे माणसांबरोबरच पशुपक्ष्यांचेही हाल होत असून, काही जीवांच्या अस्तित्वच संकटात आले आहे. ऑलिव्ह रिडले जातीच्या कासवाच्या प्रजातीला तापमानावाढीचा फटका सहन करावा लागत असल्याचे वनविभागाच्या निदर्शनास आले आहे.

रायगड जिल्ह्याच्या किनारपट्टीवर ऑलिव्ह रिडले जातीची कासवे अंडी घालण्यासाठी मोठ्या प्रमाणावर येतात. काही वर्षांपासून वनविभाग आणि कासव मित्रांच्या सहकार्याने कासव संवर्धन कार्यक्रमही सुरू आहे. मात्र, यंदा कासव संवर्धनाला फटका बसला आहे. उष्मा लाटेमुळे कासवांची अंडी उबवून पिल्ले बाहेर पडण्याच्या प्रक्रियेवर परिणाम झाला आहे. कासवांनी घातलेल्या अंड्यांपैकी फक्त ४० टक्के अंड्यांतून पिल्ले बाहेर पडली, तर ६० टक्के अंडी खराब झाली आहेत. ऑलिव्ह रिडले कासव नोव्हेंबर ते मार्चदरम्यान प्रजननासाठी समुद्रकिनाऱ्यावर येतात. कासवांनी अंडी दिल्यानंतर ५५ ते ६० दिवसांत पिल्ले बाहेर येतात. रत्नागिरी, सिंधुदुर्ग, रायगडमधील दिवेआगर, राजपुरी खाडीकिनारी कासवे मोठ्या संख्येने प्रजननासाठी येतात. पिल्ले अंड्यातून बाहेर पडताच समुद्राकडे धाव घेण्याचा अनुभव विलक्षण असतो. हा क्षण अनुभवण्यासाठी काही पर्यटकही आवर्जून येतात. यंदा हा अनुभव फारसा घेता न आल्याचे कासव संवर्धन मोहिमेत भाग घेणाऱ्या निसर्गप्रेमींनी खंत व्यक्त आहे.

उष्मालाटेमुळे राज्यातील अनेक ठिकाणचे तापमान ३८ ते ४४ अंशाच्या पुढे गेले होते. कधी नव्हे ते कोकण किनारापट्टीनेही तापमानाची चाळीशी गाठली. मागील काही वर्षांपासून सुरू करण्यात आलेल्या कासव संवर्धन मोहिमेत किनारपट्टीवरील ग्रामस्थही सहभाग घेत आहेत. त्यासाठी वनविभागाशी संपर्क करीत आहेत. यंदा वाढत्या उष्णतेमुळे कासव संवर्धन मोहीम अडचणीत आली आहे.

क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- श्री सिद्धीविनायक ज्योतिष सर्व समस्यांचे शीघ्र निवारण, नोकरी धंदा, गृहक्लेश, व्यापारवृद्धी, प्रेमसमस्या, लग्नामधील अडचण फोन नं. ९९६०४५६९८६/८८०६४७९१७३, कृष्णा शालिनी अपार्टमेंट पहिला मजला रूम नं.१०३, घरत आळी, एस.टी. स्टँडजवळ, अलिबाग/रायगड
- शिवानी पेटशॉप अलिबाग येथे कामाकरीता कमीत कमी १२ वी पास मुलगी पाहिजे ९२७२३८३४७६
- फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला मुले पाहिजेत. १० वी/१२ वी पास/ नापास मोफत प्रशिक्षण दिले जाईल. ८ तास ड्युटी, ठिकाण- बामणसुरे, चोंढी पगार-१०,००० महिना. Contact- ९०४९६५५५२३

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# माथेरानच्या राणीला पर्यटकांची पसंती

## पर्यटकांची नेरळ रेल्वे स्थानकात मोठी गर्दी



। नेरळ । वार्ताहर ।

माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांची रविवारी सायंकाळी नेरळ रेल्वे स्थानकात मोठी गर्दी उसळली होती. माथेरान मिनी ट्रेनचे तिकीट मिळवण्यासाठी खऱ्या अर्थाने ही गर्दी उसळली होती. माथेरान हे एक जागतिक दर्जाचे थंड हवेचे पर्यटन स्थळ असून, येथे येणाऱ्या पर्यटकांचे मुख्य आकर्षण म्हणजे येथील टॉय ट्रेन अर्थात मिनी ट्रेन आहे.याच मिनी ट्रेनचा आनंद आपल्या परिवारासोबत एकत्र घेता यावा म्हणून पर्यटकांची मोठी गर्दी झाली होती.

वाढत्या उष्णतेने नागरिक हैराण झालेत. त्यातूनच विकेंडचा बेत आखून पर्यटक घराबाहेर पर्यटनस्थळ पाहण्यासाठी फिरताना दिसतो.जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ असणारे थंड हवेचे ठिकाण म्हणून माथेरानची ओळख आहे. पुणे, मुंबईच्या हाकेच्या अंतरावर हे ठिकाण असून, पर्यटकांचे आवडते ठिकाण बनले आहे. सध्या माथेरानचा मान्सून हंगाम सुरू होणार आहे. पर्यटकांची पावले माथेरान दिशेने वळताना दिसत आहेत. दरम्यान, रविवारी विकेंड सुट्टी असल्याने पुणे, मुंबई येथून आलेल्या पर्यटकांची गर्दी माथेरान जाण्यासाठी म्हणून नेरळ रेल्वे स्थानकात दिसून आली. आपल्या कुटुंबासोबत माथेरान फिरण्यासाठी आलेल्या पर्यटकांनी माथेरानसोबत माथेरानच्या राणीचा अर्थात मिनी ट्रेनचा आनंद घेण्यासाठी नेरळ-माथेरान-नेरळ धावणाऱ्या ट्रेनचे तिकीट मिळवण्यासाठी नेरळ स्थानकात गर्दी केली होती.

एकीकडे उष्णतेची लाट, तर दुसरीकडे अवकाळी पाऊस यामुळे नागरिक माथेरान येथेही उन्हात पावसाचा आनंद घेतो, तर पावसाळ्यात उन्हाचा आनंद असा एकाच ऋतूत दोन वेगवेगळ्या ऋतूंचा अनुभव पर्यटकांना अनुभवाला मिळत आहे. माथेरान या थंड हवेच्या ठिकाणी एक वेगळेच वातावरण निर्माण झाल्याने पर्यटकांनी या वातावरणाचा आनंद लुटण्यासाठी माथेरानच्या दिशेने आपली पावले उचलल्याचे यानिमित्ताने दिसून येत आहेत.

### तिकीट मिळविण्यासाठी धडपड

सकाळी सहा वाजल्यापासून ही गर्दी स्थानकात दिसून येत होती. काहींना तासन्तास रांगेत उभे राहून मिनी ट्रेनचे तिकीट मिळाल्याने ते खुश होते, तर काहींना रांगेत उभे राहूनही तिकीट न मिळाल्याने त्यांचा आनंदाचा हिरमोड झाला होता. परंतु, माथेरान थंड हवा अनुभवण्यासाठी आलेल्या पर्यटकांनी थेट पर्यायी साधनांचा वापर करीत माथेरान गाठले होते. त्यामुळे माथेरान शहर पर्यटकांनी गजबजून गेले होते. शनिवार– रविवार अशा दोन दिवसांची ऑफिस सुट्टी असल्याने विकेंडचा आनंद लुटण्यासाठी पर्यटक माथेरानच्या दिशेने प्रामुख्याने वळताना दिसले.

# क्रीडा संकुलाचे राजकीय गुऱ्हाळ

## एमआयडीसीच्या धरणाच्या उर्वरित जमिनींचा प्रस्ताव



। पोलादपूर । प्रतिनिधी ।

२००७ पासून पोलादपूर तालुक्यातील क्रीडा संकुलाचा विषय सातत्याने चर्चेत आहे. ही चर्चा क्रीडा क्षेत्रातून होत नसून, फक्त राजकीय क्षेत्रातूनच होत आहे. आतापर्यंत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना आणि भाजप या राजकीय पक्षांनी या क्रीडा संकुलाच्या चर्चेचे गुऱ्हाळ आपापल्या परिने चालविंले आहे. एमआयडीसीच्या रानबाजिरे धरणाच्या संपादित जमिनीपैकी वापरात न आलेल्या जमिनींचा प्रस्ताव या गुऱ्हाळातून नेहमीच पुढे आला आहे. मात्र, लोकसभा निवडणुकीनंतर होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीमध्येही पोलादपूर क्रीडा संकुलाचे पुन्हा राजकीय पक्षांकडून गुऱ्हाळ चर्चेत येण्याची शक्यता दिसून येत आहे.

पोलादपूर तालुका क्रीडा संकुलासाठी भूसंपादन करून शासनाचा तत्कालीन आर्थिक निधी प्राप्त करावा, असा विचार २००७ मध्ये आमसभेमध्ये तत्कालीन आ.स्व. माणिक जगताप यांच्या अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यकर्त्यांनी मांडला. २००३ मध्ये शासन निर्णयामध्ये संरक्षक भिंत, ड्रेनेज व्यवस्था, अंतर्गत रस्ते, पाणीपुरवठा व विद्युतीकरण या पायाभूत सुविधांचा समावेश नव्हता आणि २००९ मध्ये जरी तालुका क्रीडा संकुलाच्या बांधकाम निधीमध्ये १ कोटी रकमेची तरतूद झाली तरी पायाभूत सुविधांचा समावेश झाल्यानंतर ही रक्कमदेखील तुटपुंजी ठरू लागली. यावर विनामोबदला जमिनीचा उपाय शोधून अशी जमीन मिळविण्याचा सपाटा जमिनमाफियांना हाताशी घेऊन सुरू झाला. योजनेमध्ये २००९ मध्ये विस्तार करण्यात आला आणि विभागीय क्रीडा संकुलासाठी २४ कोटी, जिल्हा क्रीडा संकुलासाठी ८ कोटी आणि तालुका क्रीडा संकुलासाठी १ कोटी अशी आर्थिक तरतूद करण्यात आली. त्याकाळामध्ये ४० लाख रूपये आमदारनिधी होता आणि सत्ताधाऱ्यांना दुप्पट आमदारनिधी असताना १ कोटीचा निधी डोळे विस्फारायला लावणारा होता.

रायगड जिल्हा नियोजन समिती असो अथवा आमदारनिधी अथवा खासदारनिधी याबाबत स्थानिक नेत्यांच्या तालुका क्रीडा संकुलाच्या पाठपुराव्याच्या फुकाच्या वल्गना ऐकून गेल्या २० वर्षातील शालेय खेळाडूंची प्रत्येक पिढी कपाळावर हात मारून घेत क्रीडा क्षेत्रापासून दूर होत नोकरी व शिक्षणाच्या वाटा चोखाळून तालुक्यापासून दुरावली. कोणत्याही जमिनीची निवड करण्यात आली नसताना स्थानिक जिल्हा परिषद सदस्यांपासून आमदारांपर्यंत तसेच खासदारांच्या प्रचारसभांमध्येदेखील पोलादपूर तालुका क्रीडा संकुलाचा विषय उपस्थित करण्यात आला. पावसाळी क्रीडा स्पर्धा, प्राथमिक शाळांच्या बीट क्रीडा स्पर्धा, महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धा तसेच विज्ञानप्रदर्शन आणि वार्षिक स्नेहसंमेलन असो, तालुका क्रीडा संकुलाचा विषय या स्थानिक नेत्यांनी नेहमीच ऐरणीवर मांडला आहे.

क्रीडाप्रेमींसह खेळाडूंच्या हितासाठी झटणाऱ्या ग्रामस्थांना क्रीडा संकुलाची नितांत आवश्यकता वाटत असताना राजकीय गुऱ्हाळाचा सर्वांनाच कंटाळा आला आहे. राज्य सरकारने थेट क्रीडा आणि युवक कल्याण विभागामार्फत क्रीडा संकुलासाठी प्रयत्न केल्यास तालुक्याला हक्काचे क्रीडा संकुल मिळणार आहे.

वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.
मोबाईल : ९८६०६५८५६५

### जाहीर नोटीस

दि. २१/०५/२०२४

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे गौळवाडी, ता. कर्जत जि. रायगड येथील

| सर्व्हे क्र. | हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| ५२ | ३ | ०-०९-९० | ०-६२ |

ची शेतजमीन मिळकत विदयमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविले आहे. तसा उभयतांमध्ये व्यवहार घडुन आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणापावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपटटा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरूपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबध नाही. व असल्यास ते जाणीवपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडुन दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करून आमचे अशिल उपरोक्त शेतजमीन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहीर नोटीस आहे.

ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे
रा.''मातोश्री निवास आवळस,
ता. कर्जत, जि. रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शेती मिळकत असून त्या मिळकतीचे विद्यमान मालक श्रीमती राजश्री राजाराम वाडेकर रा. मु.पो.झिराड, ता.अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून सदरची मिळकत कायम विकत घेणेबाबत आमचे अशिलानी व्यवहार ठरवलेली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| सहाण ता. अलिबाग | २०२ | ०-१०-६०<br>पो.ख ०-०१-००<br>एकूण ०-११-६० | २.६२ |

सदर वर नमूद केलेली शेती मिळकत ही या जाहीर नोटीसचा विषय आहे.

सदर मिळकती बाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क हितसंबंध बोजा अथवा गहाण, दान, लीज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेंटेनन्स, मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध व हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यांसह आपली हरकत खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांचे आत आणून द्याव्यात. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाची कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लीअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यात येईल, हे सर्वास कळावे.

अलिबाग
तारीख-२०/०५/२०२४

सही/-
ॲड. शैलेश प्रभाकर पाटील
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो.अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस कळवण्यात येते कि, आमचे अशिल १) श्री. तुकाराम किसन शिंदे, २) सौ. अर्चना तुकाराम शिंदे यांनी खालील वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सौ.हिरा महेंद्र भोपी, २ ) श्री. अशोक पांडुरंग नाक्ती ३) सौ.आशा काशिनाथ नाक्ती, यांच्याकडून कायम खरेदी करण्याचे ठरवले असून आमचे अशिल व विरहीत असल्याचे भरवसा आमचे अशिलास विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे मालकी हक्का बाबतचा शोध घेणेकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्हावहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्याचे त्याचा खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

मिळकतीचे वर्णन

| मौजे | भूमापन क्र | क्षेत्र | आकार(रु.पै) |
|---|---|---|---|
| वाळवटी, ता. मुरुड जि. रायगड | १२६ | भात ०-८०-००<br>गवत ०-१३-००<br>पो.खा. ००-००-००<br>एकुण क्षेत्र = ०-९३-०० | १६.८२ |

सदर वर नमुद केलेल्या क्षेत्र मिळकतीमधील एकुण क्षेत्रापैकी ०-४०-०० हे. आर ही मिळकत या जाहीर नोटीसीचा विषय आहे.

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फोरोक्त, पोटगी, साठेकारार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याचा कडे मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : २०/०५/२०२४

सही/-
ॲड. सिमीन पाटील
अलिबाग-रायगड

## शहराच्या प्रवेशद्वारावर रस्त्याची दुरवस्था



### नगरपंचायत प्रशासनाला दुरस्तीचा विसर

। तळा । वार्ताहर ।

तळा शहराच्या प्रवेशद्वारावर रस्त्याची दुरवस्था झाली आहे. हा रस्ता दुरुस्ती करण्याचा तळा नगरपंचायत प्रशासनाला विसर पडला असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. तळा शहराच्या प्रवेशद्वारावर माझी वसुंधरा अभियान अंतर्गत झाडे लावून सुशोभिकरण करण्यात आले आहे. या झाडांना पाणी पुरवठा करण्यासाठी सदर रस्ता खोदून पाईपलाईन टाकण्यात आली. मात्र, या झाडांना नियमित पाणी मिळत नसल्याने ते पूर्णतः सुकून गेली आहेत. शिवाय, पाईपलाईन टाकण्यासाठी खोदण्यात आलेला रस्त्याची डागडुजी करण्यात आली नसल्याने दिवसेंदिवस हा रस्ता उखडून त्याची अत्यंत दुरावस्था झाली आहे. यामुळे वाहनचालकांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, या रस्त्याची मोठमोठी डबर उखडून बाहेर पडल्याने रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनांचे टायर फुटून अपघात घडण्याची शक्यताही नाकारता येत नाही. शहराचा हा मुख्य प्रवेशद्वार असल्याने या रस्त्यावरून दिवसभर वाहनांची वर्दळ असते. पावसाळा तोंडावर आल्याने पावसाळ्यात रस्त्याची आणखी दुरवस्था होऊन अपघाताचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे, तसेच या ठिकाणी याआधी बरेचशे अपघातदेखील घडले आहेत. त्यामुळे नगरपंचायत प्रशासनाने या गोष्टीकडे गांभीर्याने लक्ष देऊन सदर रस्त्याची त्वरित डागडुजी करावी, अशी मागणी प्रवाशांकडून केली जात आहे.

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसव्दारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे वर्णन केलेली शेत जमिन मिळकत ही रजि. खरेदीखताने खरेदी करण्याबाबत आमचे अशिल यांच्यासोबत सदरहू शेत जमिन मिळकतीचा व्यवहार ठरविण्यात आलेला आहे. सदरहू शेत जमिन मिळकतीचे ७/१२ उताऱ्याप्रमाणे असलेले वर्णन खालीलप्रमाणे-

शेत जमिन मिळकतीचे वर्णन -

| अ. क्र. | मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र ( हे.आर.चौ.मी.) | आकार (रु. पै.) |
|---|---|---|---|---|
| १) | बोरगांव | १०६ | ०.५१.००<br>पो.ख. ०.०२.००<br>एकूण ०.५३.०० | ०.९५ |

**वरील वर्णनाच्या शेत जमिन मिळकती पैकी ०.४०.०० हे.आर.चौ.मी.ही मिळकत या जाहीर नोटीसचा विषय आहे.**

वरील वर्णनाची संदर्भित शेत जमीन मिळकत पूर्णतः निर्वेध, बोजाविरहित व विनाजोखीम असल्याबाबतचा हवाला सदरहू शेत जमिन मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही सदरच्या शेत जमिन मिळकतीमध्ये अन्य कोणाचाही भाडेपट्टा, गहाण, बोजा, कुळ वहिवाट, ताबा बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, विकसन करारनामा, मृत्युपत्रांकित दान, जप्ती, लिज, लिन अथवा अन्य प्रकारचा कायदेशीर हक्क व हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद् झाल्यापासून २७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे आपल्या हरकती प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह दाखल करण्यात याव्यात अथवा रजिस्टर्ड पोस्टाने २७ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्याकडे पोहचतील अशा रीतीने पाठवाव्यात.

याप्रमाणे वरील मुदतीत हरकत न आल्यास सदरहू शेत मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत आहे असे समजून त्यासंबंधी कोणाचेही कोणत्याही प्रकारचे कायदेशीर हक्क, हितसंबंध नाहीत व असल्यास संबंधीतांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजण्यात येऊन आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील. व वरील मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणाचीही कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही हे कळावे.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.
पेण
दिनांक २१/०५/२०२४

खरेदीदारांचे वकील ॲड.
श्री. जयंत घ.वैरागी
ऑफिस :- 'वैरागी व्हिला'',
पेण नगरपरिषद कार्यालय समोर, पेण,
चिंचपाडा रोड, ता. पेण, जि. रायगड
मो.नं. ९८८१६७१४२४

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे गौरकामत, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची बिनशेती मिळकत तिचे मालक श्री. सुनिल हरिभाऊ पालांडे यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्रफळ (चौ. मी.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| ७१ | १२ | ४.०८.७६ | ४१=०० |

वर वर्णन केलेल्या बिनशेती मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवुन आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक २०/०५/२०२४

ॲड. महेश मोतीराम घारे
मु.सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४
९२७१८६९२०२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे. पेठ, ता. कर्जत, जि.रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. गणेश शंकर सावंत यांचेकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे:-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे-आर-पॉ) | आकार (रू. पै) |
|---|---|---|---|
| ५ | १ | १-५०-० | ०-८४ |

वरील जमिन मिळकती मधील जमिन मालक श्री. गणेश शंकर सावंत यांचे मालकीचे क्षेत्र ०-४०-० हे.आर.पॉ असून त्यापैकी विकत दिलेले क्षेत्र ०-२०-० हे.आर.पॉ

वरील जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हकहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक: २०/०५/२०२४

ॲड. राकेश भरत भोईर
ऑफीस - कशेळे, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ८१४९९४१८५२

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेंत येते की, खाली वर्णन केलेली मिळकत त्या मिळकतीचे मालक श्री. हरीश राजेंद्र भोपतराव, रा. कडाव, ता.कर्जत, जि. रायगड यांचेकडून आमचे अशिलाने कायम खरेदी घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खाली लिहीले प्रमाणे,

**मौजे वैजनाथ, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत.**

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र हे.- आर | आकार रू.=पैसे |
|---|---|---|---|
| १७ | १ | १-७५.४० | ९=८५ |

यापैकी ०-९५.४० हेक्टर श्री. हरीष राजेंद्र भोपतराव, यांचे मालकीची. तदंगभूत सर्व हक्क हितसंबंध यासुद्धा.

तरी वरील मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा, कोणताही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध, ताबा - कबजा, कुळवहिवाट, बोजा, चार्ज, पोटगी-हक्क, मृत्यूपत्रांकीत दान, गहाण, बक्षीस, साठेकरार, करार मदार, फरोक्त, लिएन वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ दिवसांचे आत सकृतदर्शनी पुराव्यासह लेखी हरकत खालील सही करणार यांजकडे कळविणेस विनंती आहे. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील, मागाहून येणाऱ्या तक्रारी/हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, कळावे.

तारीख:- २१-०५-२०२४.

श्री. विवेक अशोक धनवी,
बी. कॉम., एलएल.बी., ॲडव्होकेट,
ऑफीस गाळा नं. ७ सुमनराज को-ऑप. हौऊ. सोसायटी, पाटीलआळी, दहिवली,
ता. कर्जत, जि. रायगड,
मोबाईल नंबर - ९०११७३६००२.

## जिन शासन स्थापना दिवस साजरा

**कर्जत :** जिन स्थापना दिवसानिमित्त आज कर्जतमध्ये संस्कार वाटीकाच्या वतीने धार्मिक कार्यक्रमासह विविध समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये जैन धर्मियांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून प्रतिसाद दिला.

जिन स्थापना दिवसानिमित्त कर्जत शहरात प्रभात फेरीचे आयोजन केले होते. यावेळी संस्कार वाटीकाच्या प्रत्येक मुलाच्या हातात जिन शासनाचा झेंडा घेऊन प्रभात फेरी काढण्यात आली होती. त्यानंतर जैन मंदिरामध्ये बारा महिने सेवा देणारे नथुराम प्रजापती, जयराम भोईर, पुजारी शांतीलाल वैष्णव, शंकर वैष्णव यांच्याहस्ते जिन शासनाचा ध्वज फडकाविण्यात आला. यावेळी उपस्थितांनी ध्वजाला सलामी दिली. याप्रसंगी जैन श्वेतांबर संघाची अध्यक्ष अजित ओसवाल, किरण जैन, फुटरमल ओसवाल, राजेश सोलंकी, प्रिन्स ओसवाल, सचिन ओसवाल, संजय ओसवाल, हर्ष ओसवाल, डॉ. मनीष ओसवाल, तसेच कीर्ती ओसवाल, अनेक जैन बांधव भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

जाहीर नोटीस

सदर जाहीर नोटिसद्वारे कळविण्यात येते की, मऔविम इसांबे औद्योगिक क्षेत्रामधील भुखंड क्र.१८/१, मे. आय ओ एन एक्सचेंज (इंडिया) लिमिटेड च्या भुखंडावरील झाडे कापणे करीता वृक्ष अधिकारी म्हणून माझेकडे विनंती आहे. भुखंडावरील झाडांची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व भुखंड क्र. | एकूण | वृक्ष कापण्यासाठी परवानगी मागितलेली संख्या वृक्ष संख्या | तोडण्याचे / कापण्याचे/ प्रत्यारोपण करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | मे. आय ओ एन एक्सचेंज (इंडिया) लिमिटेड भुखंड क्र. १८/१, | ३६ | १. वृक्ष कापणे व त्यांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.<br>बाभुळ - ०६<br>सुबाभळ - ०३<br>एकुण - ०९<br>२. वृक्ष पुर्नलागवड करणे व त्यांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.<br>अशोका- ०७<br>बदाम-०३<br>करंज-०५<br>आंबा- ०४<br>औदुंबर-०३<br>गुलमोहर- ०३<br>पर्जन्यवृक्ष-०२<br>एकुण- २७ | १. बांधकामास अडथळा निर्माण होत असल्यामुळे झाडे कापणेसाठी प्रस्तावित.<br>२. पुर्न:लागवडी करीता प्रस्तावित झाडे. |

तरी Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act.१९७५ कलम ८ (३) (a) नुसार सदर वृक्ष तोडण्यासंदर्भात कसल्याही प्रकारच्या हरकती असल्यास तसे त्यांनी आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ८ दिवसांचे आत खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. तसे न कळविल्यास सदर भुखंडावरील वृक्ष कापण्याबाबत व प्रत्यारोपणास परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची व कसलीही तक्रार ग्राहय घेण्यात येणार नाही. सबब सदर नोटीस प्रसिध्दीस देत आहे.

कार्यालयाचा पत्ता :- उप अभियंता, मऔविम, उपविभाग रोहा,
धाटाव, ता. रोहा,
जि. रायगड - ४०२११६
फोन नं. ०२१९४ २६३८२५

सही /-
वृक्ष अधिकारी तथा उप अभियंता
विशेष नियोजन प्राधिकरण

### जाहीर सुचना

सर्व लोंकाना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्रीमती बेबी रघुनाथ पिंगळे, श्रीमती अस्मिता संकेत वारे, श्री. राहुल रघुनाथ पिंगळे, श्रीमती अर्चना रघुनाथ लांडगे यांच्याकडुन कायमचे खरेदीकरण्याचे ठरविले आहे.

**जमिन मिळकतीचे वर्णन**

**मौजे पाचखडकवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील जमीन मिळकत सर्व्हे नं १०/६/अ एकुण ३.१६.०० गुंठे जागा पैकी ०.४०.०० विकत घेणार आहेत. तरी जमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपटटा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्क हित संबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक २०/०५/२०२४

ॲड देविदास यशवंत देवघरे
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल निलोफर हमीद अब्दुल सुक्कुर हया खालील वर्णन केलेली जमिन मिळकत तीचे विद्यमान मालक सादिया शारिक खरबे यांचे कडून विकत घेण्याचे ठरवीले आहे.

**मिळकतीचे वर्णन मौजे. कळंब, ता. कर्जत, जि. रायगड.**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रू. पै.) |
|---|---|---|---|
| १३६ | ९ | ०-४०-०० | ३-८३ |

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास हि जाहीर नोटीस प्रसीद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही.
कळावे

दि. २१/०५/२०२४.

ॲड. सुमित दत्तात्रेय कराळे.
पत्ता-ममदापुर नेरळ
ता. कर्जत, जि. रायगड
मो.-९१६८९७८४३८.

निवडक

## प्रेक्षक हवेच

**सिंगापूर :** रिकाम्या स्टेडियममध्ये फॉर्म्युला वन शर्यतींचे आयोजन हे व्यवहाराला धरून नाहीच, असे भाष्य करत सिंगापूर ग्रांप्री शर्यतीच्या आयोजकांनी फॉर्म्युला वन जागतिक अजिंक्यपदाबाबतच्या अडचणींमध्ये भरच टाकली आहे. करोनामुळे आतापर्यंत फॉर्म्युला वनच्या दहा शर्यती आतापर्यंत रद्द करण्यात आल्या आहेत. ही कमतरता भरून काढण्यासाठी शर्यतींच्या व्यवस्थापनाने ऑस्ट्रियात दोन शर्यतींचे आयोजन करायचे ठरवले आहे.

## म्हणून ख्वाजा बाहेर

**मेलबर्न :** सीनियर फलंदाज उस्मान ख्वाजाच्या कामगिरीतच सातत्य नाही. अशा परिस्थितीत त्याला ऑस्ट्रेलियाच्या वार्षिक करारातून काढणे रास्तच होते, असे उद्गार काढले आहेत ते दोनवेळा ऑस्ट्रेलियाला वर्ल्ड कप जिंकून देणारा कर्णधार रिकी पाँटिंगने. ३३ वर्षांच्या ख्वाजाला ऑस्ट्रेलिया संघात पुनरागमन करण्यासाठी खूप संघर्ष करावा लागणार असल्याचे भाकीतही टी२० विश्वचषक उंबरठ्यावर असताना रिकी पाँटिंगने नोंदवले आहे.

## स्टेडियम उभारण्याचा निर्णय

**कोलंबो :** श्रीलंकेने होमागामा येथे देशातील सर्वात मोठे क्रिकेट स्टेडियम उभारण्याचा निर्णय घेतला आहे; पण यावर प्रश्न उपस्थित केला आहे तो त्यांचा माजी अभ्यासू कर्णधार महेला जयवर्धनेने. आता आपल्याकडे असलेल्या स्टेडियमचाच पूर्ण वापर होत नसताना आणखी एका अवाढव्य स्टेडियमची आवश्यकता काय, असा सवाल जयवर्धनेने केला आहे. श्रीलंका सरकारने श्रीलंकन क्रिकेट बोर्डाशी चर्चा करत रविवारी ६० हजार प्रेक्षक क्षमता असलेल्या स्टेडियमची घोषणा केली आहे.

## रग्बीपटूंना केले निलंबित

**लॉस एंजेलिस :** रग्बी संघ वैलाबीजचा फॉरवर्ड, इजाक रोडा आणि क्वीन्सलँड रेड्स संघाच्या दोन खेळाडूंवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. कोरोना विषाणूच्या संसर्गामुळे रग्बी लीग निलंबित करण्यात आली आहे. हा आर्थिक तोटा भरून काढण्यासाठी रग्बीपटूंना निलंबनाला सामोरे जावे लागते आहे; पण वैलाबीजचा फॉरवर्ड, इजाक रोडा आणि क्वीन्सलँड रेड्स रग्बीपटूंनी वेतनकपातीस नकार दिल्याने त्यांच्यावर निलंबनाची कारवाई झाली आहे.

## म्युनिकचा बर्लिनवर विजय

**बर्लिन :** जगामध्ये फुटबॉल खेळाचे वेड अधिक आहे. अनेक फुटबॉल स्पर्धांना असणारी बक्षिसे आणि त्यामध्ये खेळणाऱ्या खेळाडूंचे आकर्षण अधिक असते. रॉबर्ट लेवानदोवस्कीच्या गोलमुळे बायर्न म्युनिकने बुंदेसलीगा फुटबॉल स्पर्धेत युनियन बर्लिनवर २-० असा विजय मिळवला. लेवानदोवस्कीने पूर्वार्धात पेनल्टीवर गोल केला, तर डिफेंदर बेंजामिन पेवार्डने उत्तरार्धात लढत आटोपण्यास काही मिनिटे शिल्लक असताना गोल करत बायर्न म्युनिकचा विजय निश्चित केला.

### थायलंड खुली बॅडमिंटन स्पर्धा

# सात्त्विक-चिरागला विजेतेपद

## चीनच्या जोडीवर मात; भारतीय जोडी यंदाच्या हंगामात दुसऱ्यांदा अजिंक्य



**। बँकॉक । वृत्तसंस्था ।**

**बँकॉक : भारताच्या सात्त्विक साईराज रंकीरेड्डी आणि चिराग शेट्टी या तारांकित जोडीने चीनच्या चेन बो यांग आणि लियू यी जोडीला नमवत थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेतील (सुपर ५०० दर्जा) पुरुष दुहेरीचे जेतेपद पटकावले. यासह पॅरिस ऑलिम्पिकपूर्वी आपण योग्य मार्गावर असल्याचेही त्यांनी दाखवून दिले.**

जागतिक क्रमवारीत तिसऱ्या स्थानी असणाऱ्या सात्त्विक-चिराग जोडीने २९ व्या मानांकित चीनच्या जोडीला २१-१५, २१-१५ असे सरळ गेममध्ये पराभूत केले. आशियाई क्रीडा स्पर्धेतील सुवर्णपदक विजेत्या भारतीय जोडीचे हे हंगामातील दुसरे आणि 'बीडब्ल्यूएफ' जागतिक टूर स्पर्धेत कारकीर्दीतील नववे जेतेपद ठरले. त्यांनी मार्चमध्ये फ्रेंच खुल्या बॅडमिंटन स्पर्धेचे (सुपर ७५० दर्जा) जेतेपद मिळवले. तसेच या जोडीने यंदा मलेशिया खुल्या (सुपर १००० दर्जा) आणि इंडिया खुल्या (सुपर ७५० दर्जा) बॅडमिंटन स्पर्धेतही अंतिम फेरीचा टप्पा गाठला होता. सात्त्विक-चिराग जोडीला ऑल इंग्लंड अजिंक्यपद स्पर्धेत दुसऱ्याच फेरीत पराभूत व्हावे लागले होते. त्यानंतर सात्त्विकला झालेल्या दुखापतीमुळे ही जोडी आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत खेळू शकली नाही. थॉमस चषकातही या जोडीला चांगली कामगिरी करता आली नाही. मात्र, थायलंड खुल्या स्पर्धेत सात्त्विक आणि चिरागने आपला सर्वोत्तम खेळ करताना एकही गेम न गमावता जेतेपदावर मोहोर उमटवली. चीनच्या चेन-लियू जोडीने सात्त्विक-चिरागला झुंज देण्याचा प्रयत्न केला, पण त्यांना यश मिळाले नाही.

अंतिम सामन्यात सात्त्विक-चिराग जोडीने दमदार सुरुवात करताना पहिल्या गेममध्ये ५-१ अशी आघाडी मिळवली. यानंतर चेन आणि लियू यांनी पुनरागमन केले. त्यांनी १०-७अशी आघाडीही मिळवली. मात्र, सात्त्विक-चिरागने सलग तीन गुण कमावताना गेम १०-१० असा बरोबरीत आणला. गेमच्या मध्यंतरानंतर सात्त्विक-चिराग जोडीने आधी १४-११ अशी आघाडी घेतली, मग ती १६-१२ अशी वाढवली. चीनच्या जोडीने तीन गुणांची कमाई केली, पण त्यानंतर भारतीय जोडीने सलग पाच गुण मिळवत गेम जिंकला.

दुसऱ्या गेममध्ये भारतीय जोडीने आक्रमक सुरुवात केली. त्यांनी ८-३ अशी आघाडी घेतली आणि मध्यंतराला ११-६ अशी आघाडी राखली. चेन आणि लियू जोडीने सलग तीन गुण मिळवत पुनरागमनाचा प्रयत्न केला. मात्र, सात्त्विकने त्यांची लय मोडली. भारतीय जोडीकडे १५-११ अशी आघाडी असताना सर्विस करण्यास विलंब लावल्याबद्दल सात्त्विकला चेतावणी देण्यात आली. त्यानंतर चिरागकडून चुका झाल्याने चीनच्या जोडीला गुण मिळाले.

> आता सर्वांचेच लक्ष पॅरिस ऑलिम्पिककडे आहे. सर्वच खेळाडूंना या स्पर्धेत पदक जिंकायचे आहे. आम्हालाही चांगली कामगिरी करण्याचा विश्वास आहे. दुहेरीत चीन किंवा इंडोनेशियाच्या खेळाडूंना हरवणे हे अशक्यप्राय आव्हान मानले जायचे. मात्र, आम्ही हे वारंवार करून दाखवले आहे.
> -चिराग शेट्टी



## मोबाईलच्या जगतात मैदानी खेळ तग धरून

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

मोबाईल, संगणकातील खेळामध्ये रमणारी पिढी मैदानी खेळापासून दुर होण्याच्या मार्गावर होती. मात्र ग्रामीण भाग याला अपवाद ठरला आहे.

मे महिन्याची सुट्टी असल्याने ग्रामीण भागातील अनेक बच्चे कंपनी मैदानी खेळाकडे रमू लागली आहेत. त्यात क्रिकेट खेळाला ते अधिक पसंती दर्शवित आहेत. त्यामुळे मैदानी खेळ आजही तग धरून असल्याचे चित्र आहे.

मोबाईलमध्ये फ्रि फायर, पबजी, कॅन्डी क्रश, क्रिकेट, कार चालविणे असे अनेक खेळाचे ॲप उपलब्ध आहेत. त्यामुळे घरबसल्या वेगवेगळ्या खेळाचा आनंद बच्चे कंपनीसह तरुणांना घेता येत आहे. मोबाईलमधील खेळाला तरुणाई अधिक पसंती दर्शवित आहेत. त्यामुळे तरुणाई मैदानी खेळापासून दुरावण्याचा धोका निर्माण झाला आहे. सुट्टी अथवा अन्य फावल्या वेळात तरुण मंडळी व बच्चे कंपनी मोबाईलमधील खेळ खेळत आहेत.

त्यामुळे मैदानी खेळ कालबाह्य होण्याच्या मार्गावर असताना आजही ग्रामीण भागात मैदानी खेळ तग धरून असल्याचे दिसून येत आहे. उन्हाळी सुट्टी पडली आहे. शाळा बंद आहेत.

त्यामुळे लहान मुले, तरुण मंडळी गोट्या, क्रिकेटसारखे मैदानी खेळ खेळले जात आहेत. मोबाईलच्या जगतामध्ये आजही गावे, वाड्यांमध्ये क्रिकेट खेळाला अधिक पसंती आहे. सकाळी अथवा संध्याकाळी अनेक तरुण क्रिकेट खेळ खेळत असल्याने मैदानी खेळ तग धरून असल्याचे दिसून येत आहे.

> **मला क्रिकेट खेळ खुप आवडतो. मोबाईल खेळापेक्षा मैदानी खेळ अधिक चांगले वाटतात. खुप मजा येते. पहिले मला मोबाईलमधील खेळ खुप आवडायचे. पण मैदानात खेळाचा आनंद मिळत नव्हता. पण क्रिकेटमुळे तो आनंद प्रत्यक्षात अनुभवता आला आहे. सर्वजण एकत्र येतो.**
> **- यज्ञेश नयन जाधव**

## कुस्ती संघटना घेणार २१ मे रोजी चाचण्यांबाबत निर्णय

**। पॅरिस । वृत्तसंस्था ।**

आगामी पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारतीय संघ निवडण्यासाठी भारतीय कुस्ती महासंघ २१ मे रोजी निवड निकष ठरवेल. पीटीआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संघ त्याच दिवशी निर्णय घेईल की, ज्या खेळाडूंना कोटा मिळेल ते चाचण्यांमध्ये भाग घेतील की थेट ऑलिम्पिकची तयारी सुरू करतील. कुस्ती संघटनेने असे केल्यास विनेश फोगट आणि अमन सेहरावत यांच्यासारख्या कुस्तीपटूंना दिलासा मिळेल.

भारताने ऑलिम्पिक स्पर्धेसाठी कुस्तीमध्ये सहा कोटा स्थान मिळवले आहेत. त्यापैकी पाच महिला कुस्तीपटूंना मिळाले आहे. पुरुषांच्या फ्रीस्टाइल ५७ किलो गटात कोटा मिळवणारा अमन सेहरावत हा एकमेव पुरुष कुस्तीपटू आहे. २६ जुलैपासून सुरू होणाऱ्या पॅरिस गेम्समध्ये देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी कुस्तीपटूंची निवड करण्यासाठी अंतिम चाचणी घेण्यात येणार असल्याचे कुस्ती संघटनेने सांगितले होते. आधी नमूद केलेल्या निकषांनुसार, अंतिम चाचण्यांमधील अव्वल चार मानांकित कुस्तीपटू एकमेकांशी स्पर्धा करतील आणि त्यांच्यातील अव्वल मानांकित कुस्तीपटू कोटा विजेत्याशी स्पर्धा करतील. कुस्ती संघटनेतील एका सूत्राने सांगितले.

## अय्यर-किशन यांना आणखी एक संधी

### बीसीसीआयने ३० खेळाडूंची केली निवड, त्यात मुशीर आणि मयंक यांच्या नावाचाही समावेश

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना आणखी एक संधी दिली आहे. दोघांची राष्ट्रीय क्रिकेट अकादमी उच्च कामगिरी कार्यक्रमासाठी निवड झाली आहे.

गेल्या मोसमात रणजी ट्रॉफीचे सामने न खेळल्यामुळे अजित आगरकर यांच्या निवड समितीने या दोन्ही खेळाडूंना बीसीसीआयच्या केंद्रीय करारातून वगळले होते. दोन महिन्यांनंतर अय्यर आणि ईशानचा विशेष संघात समावेश करण्यात आला.

श्रेयस-ईशान निवडकर्त्यांच्या रडारवर

बीसीसीआयच्या एका सूत्राने शनिवारी टाईम्स ऑफ इंडियाला सांगितले की, बीसीसीआय किंवा एनसीए यांच्याकडे अय्यर आणि इशान यांच्याविरुद्ध कोणतीही तक्रार नाही. जर त्यांनी देशांतर्गत क्रिकेटकडे पाहण्याचा दृष्टिकोन सुधारला आणि येत्या देशांतर्गत हंगामात त्याच्या घरच्या संघाकडून (मुंबई आणि झारखंड) खेळले, तर त्यांना केंद्रीय करार पुन्हा मिळण्याची शक्यता आहे.

दोन्ही खेळाडूंनी चांगली कामगिरी केल्यास ते टीम इंडियात पुनरागमन करू शकतात. हे त्यांच्यासाठी एक संकेत आहे की



ते निवडकर्त्यांच्या रडारवर आहेत.

**३० खेळाडूंची निवड**

उच्च कामगिरीसाठी श्रेयस अय्यर, इशान किशन, मुशीर खान, मयंक यादव, उमरान मलिक, आवेश खान, कुलदीप सेन, हर्षित राणा, खलील अहमद, आशुतोष, तुषार देशपांडे, रायन पराग, साई सुदर्शन, साई किशोर, देवदत्त पडिक्कल, पृथ्वी. शॉ, तनुष कोटियन यांच्यासह ३० खेळाडूंची निवड करण्यात आली आहे.

**बीसीसीआयच्या केंद्रीय करारातून अय्यर-किशन बाहेर**

श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांना बीसीसीआयच्या केंद्रीय करारातून वगळण्यात आले कारण ते रणजी सोडून -२०२४ ची तयारी करत होते.

हा करार १ ऑक्टोबर २०२३ ते ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत चालेल. बोर्डाने लिहिले होते की, वार्षिक कराराच्या शिफारशींदरम्यान श्रेयस अय्यर आणि इशान किशन यांच्या नावांचाही विचार करण्यात आला होता, परंतु त्यांना केंद्रीय करारामध्ये स्थान देण्यात आले नाही.

## केकेआर अंतिम फेरीत?



**आयपीएल २०२४ च्या प्लेऑफ वेळापत्रक**

**क्वालिफायर-१: केकेआर विरुद्ध एसआरएच, २१ मे, अहमदाबाद**
**एलिमिनेटर: आरसीबी विरुद्ध आरआर, २२ मे, अहमदाबाद**
**क्वालिफायर -२: क्वालिफायर १ पराभूत वि एलिमिनेटर विजेता, २४ मे, चेन्नई**
**फायनल क्वालिफायर १ विजेता विरुद्ध क्वालिफायर २ विजेता, २६ मे, एमए चिदंबरम स्टेडियम, चेन्नई,**
**चौथी कसोटी: २६-३० डिसेंबर, मेलबर्न**
**पाचवी कसोटी: ३-७ जानेवारी, सिडनी**

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

आयपीएल २०२४ मधील आता प्लेऑफ्सचे सामने सुरू होणार आहेत. २१ मे रोजी आयपीएल २०२४ चा पहिला क्वालिफायर कोलकाता नाईट रायडर्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात खेळवला जाईल. अहरदाबादच्या नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर हा सामना खेळवला जाणार आहे. या सामन्यात केकेआरला दुहेरी फायदा होणार आहे. आयपीएलच्या नियमानुसार केकेआर हैदराबादविरुद्ध सामना न खेळताही अंतिम फेरीत पोहोचू शकतो. त्यामुळे केकेआर अंतिम फेरीत पोहोचणार हे जवळपास निश्चित झाले आहे.

कोलकाता नाईट रायडर्स गुणतालिकेत अव्वल स्थानावर आहे. केकेआर हा आयपीएल इतिहासातील सर्वोत्तम नेट रन रेट असलेला संघ ठरला आहे. या हंगामात खेळल्या गेलेल्या एकूण १४ पैकी ९ सामने जिंकून २० गुणांसह गुणतालिकेत पहिल्या स्थानावर आहे. याशिवाय सनरायझर्स हैदराबाद संघ १४ पैकी ८ सामने जिंकून १७ गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. आयपीएलमधील साखळी सामन्यातनंतर आता प्लेऑफ्सच्या सामन्यातही पाऊस खोडा घालण्याची शक्यता आहे. या हंगामात आतापर्यंत तीन सामने पावसामुळे रद्द झाले आहेत. अशा परिस्थितीत पहिला क्वालिफायरही पावसामुळे रद्द झाल्यास काय होईल याचा विचार केला आहे का?पहिला क्वालिफायर सामन्यात पावसाने अडथळा आणला, तर सर्व प्रथम पंच हे सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करतील की सामना कसा तरी किमान ५ षटकांचा खेळवता येईल. मात्र, पाऊस खूपच वेळ सुरु राहिला आणि सामना उशिराने सुरु झाला, तर पंच ५ षटकांऐवजी १ षटकांची सुपर ओव्हर खेळवण्याचा निर्णय घेतील. जर पावसामुळे हेही साध्य नाही आणि सामना रद्द झाला, तर गुणतालिकेत अव्वल स्थानावर असलेला केकेआर संघ सामना न खेळताच अंतिम फेरीत प्रवेश करेल.कारण राखीव दिवस केवळ अंतिम सामन्यासाठी ठेवण्यात आला आहे. केकेआर आधीच फॉर्मात आहे. केकेआरच्या गोलंदाजांपासून फलंदाजांपर्यंत सर्वजण उत्कृष्ट फॉर्ममध्ये आहेत, त्यामुळे केकेआर संघ आधीच ट्रॉफी जिंकण्याचा प्रबळ दावेदार मानला जात होता. आता पाऊस पडला तरी केकेआरला फायदा होणार आहे. यावरून असे दिसते की, केकेआरला दुहेरी फायदा मिळणार आहे.

आयपीएल २०२४ मधील ७० सामन्यांच्या लीग स्टेजनंतर प्लेऑफचे चित्रही स्पष्ट झाले आहे. दोन वेळच्या चॅम्पियन कोलकाता नाईट रायडर्सने लीग टप्पा पहिल्या स्थानावर संपवला, तर सनरायझर्स हैदराबादने दुसरे, राजस्थान रॉयल्स तिसरे आणि रॉयल्स चॅलेंजर्स बंगळुरू चौथ्या स्थानावर राहिले.

## अपराजित लेव्हरकूसेनची ऐतिहासिक कामगिरी

**। लेव्हरकूसेन । वृत्तसंस्था ।**



बायर लेव्हरकूसेन संघाने जर्मनीतील बुंडसलिगा फुटबॉल स्पर्धेत संपूर्ण हंगाम अपराजित राहण्याची ऐतिहासिक कामगिरी केली. लेव्हरकूसेनने अखेरच्या सामन्यात ऑग्सबर्गवर २-१ असा विजय मिळवला.

स्पेनचा माजी मध्यरक्षक झाबी अलोन्सोच्या मार्गदर्शनाखालील लेव्हरकूसेन संघाने यंदाच्या हंगामात विविध स्पर्धात अनेक विक्रम मोडले आहेत. लेव्हरकूसेनने यंदा बुंडसलिगामध्ये संपूर्ण हंगाम अपराजित राहण्याची किमया साधली आणि अशी कामगिरी करणारा हा पहिलाच संघ ठरला. त्यांनी या स्पर्धेत २८ सामने जिंकले, सहा सामने बरोबरीत सोडवले आणि एकही पराभव पत्करला नाही. तसेच लेव्हरकूसेनच्या संघाने बायर्न म्युनिकच्या वर्चस्वालाही धक्का दिला आणि आपले पहिले बुंडसलिगा जेतेपद पटकावले.

ऑग्सबर्गविरुद्धचा सामना संपल्यानंतर लेव्हरकूसेनला बुंडसलिगा विजेत्यांना मिळणारी ढाल देण्यात आली. त्यानंतर अलोन्सो आणि लेव्हरकूसेनचा कर्णधार लुकास हरडेस्की यांनी प्रेक्षकांत जाऊन जेतेपदाचा आनंद साजरा केला. ऑग्सबर्गविरुद्धच्या सामन्यात लेव्हरकूसेनसाठी व्हिक्टर बोनिफेस आणि रॉबर्ट ॲन्ड्रिच यांनी गोल नोंदवले. ऑग्सबर्गचा एकमेव गोल मेर्त कोमूरने केला.

लेव्हरकूसेनच्या संघाला या हंगामात सर्व स्पर्धांत मिळून अपराजित राहण्याची संधी आहे. ते आता जर्मन चषक आणि युरोपा लीगच्या अंतिम सामन्यात खेळणार आहे.

## 'क्रिकेटपटू व्हायचे होते'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑलिम्पिक इतिहासातील रहान धावपटू... आठ ऑलिम्पिक सुवर्णपदकांचा धनी... १०० आणि २०० मीटरच्या शर्यतींमध्ये हुकूमत... अशी अनेक विशेषणे जमैकाचा माजी धावपटू उसेन बोल्टला देता येतील. मात्र 'क्रिकेट माझ्या रक्तात असून क्रिकेटप्रेमाचा वारसा मला वडिलांकडून लाभला आहे. मुळात क्रिकेटपटू होण्याचेच माझे स्वप्न होते', एखाद्या निस्सिम क्रिकेटप्रेमीप्रमाणे ही प्रतिक्रिया बोल्टने गुरुवारी व्यक्त केली.

क्रिकेटपटू होता आले नसले, तरी पुढील महिन्यात विंडीज-अमेरिकेत होणाऱ्या वर्ल्ड कप टी-२० स्पर्धेचा 'ॲम्बेसिडर' होण्याचा मान त्याला मिळाला. 'माझे बालपण क्रिकेटमय होते. मी जमैकात वाढलो, वडील दर्दी क्रिकेटप्रेमी, त्यामुळे हा खेळ राझ्या रक्तातच आहे, असे म्हणा', असे बोल्ट सांगतो.

# आफ्रिकेत फडकणार भारताचा झेंडा

**। जालना । वृत्तसंस्था ।**

**प्रत्येक जण आपल्या स्वप्नांचा पाठलाग करत असतो. कुणी यशस्वी होण्यासाठी, कुणी पद प्रतिष्ठा मिळवण्यासाठी तर कुणी पैसे कमवण्यासाठी धडपडत असतात. आपल्या आजूबाजूला असंख्य ध्येयवेडेही असतात. जालना शहरातील जितेंद्र अग्रवाल हे देखील यापैकीच एक आहेत. मागील सहा वर्षांपासून ते वेगवेगळ्या मॅरेथॉन स्पर्धांमध्ये भाग घेत आहेत. आता ते जगातील प्रतिष्ठेची मानल्या जाणाऱ्या आफ्रिकेतील कॉम्रेड मॅरेथॉनमध्ये धावणार आहेत.**

## जालनाकर धावणार जगप्रसिद्ध कॉम्रेड मॅरेथॉन

**९ जूनला कॉम्रेड मॅरेथॉन**

व्यायामाची तसेच खेळांची आवड असलेले अग्रवाल आतापर्यंत मुंबई, नाशिक, पुणे, सातारा येथे झालेल्या मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी झाले आहेत. ४२ किमी, ६५ किमी आणि ७५ किमी अंतराचे मॅरेथॉन स्पर्धा त्यांनी लिलया पार केल्या आहेत.

येत्या ९ जून रोजी दक्षिण आफ्रिकेतील प्रतिष्ठित कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत जालना शहरातून सहभागी होणारे ते पहिलेच धावपटू आहेत. देशभरातून ३५० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत सहभागी होणं हे एका धावपटूसाठी सन्मानाची बाब मानली जाते.

**शाळेपासूनच खेळाची आवड**

शाळेत असल्यापासूनच मला खेळाविषयी आवड होती. त्यामुळे लहानपणापासूनच मी खेळाडू राहिलो आहे. वेगवेगळ्या स्पर्धांमध्ये तसेच क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होणं ही माझी आवड आहे. आजही दिवसातील सकाळी ३ तास जिम, रनिंग, सायकलिंग आणि स्विमिंग या गोष्टींसाठी देतो.

मागील ६ वर्षांपासून नियमितपणे मॅरेथॉन स्पर्धांमध्ये सहभागी होत असून वेगवेगळ्या अल्ट्रा मॅरेथॉन स्पर्धा वेळेच्या आधी पूर्ण केल्या आहेत, असे अग्रवाल सांगतात

**कॉम्रेड मॅरेथॉन धावण्यासाठी अट**

येत्या ९ जून रोजी दक्षिण आफ्रिका येथे कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धा होत आहे. या स्पर्धेत एकूण साडेतीन हजार स्पर्धक सहभागी होणार आहेत. यापैकी आपल्या देशातून ३५० स्पर्धक असणार आहेत. जालना शहरातून केवळ मी एकमेव असणार आहे. या मॅरेथॉन स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी धावपटूला ४ तास ५० मिनिटांत ४२ किमींची मॅरेथॉन स्पर्धा पूर्ण करणं गरजेचं असतं, असं जितेंद्र अग्रवाल यांनी सांगितलं.

**व्यायाम शरीरासाठी गरजेचा**

प्रत्येकाने आपल्या आरोग्याप्रती जागरूक राहून नियमितपणे व्यायाम करावा. तसेच योग्य तो आहार फॉलो करावा. ज्यामुळे निरोगी आरोग्य प्रत्येकाला मिळेल. प्रत्येकजण सुदृढ राहील, असं आवाहन अग्रवाल यांनी केलंय. दक्षिण आफ्रिकेतील डरबन येथे होणाऱ्या कॉम्रेड मॅरेथॉन स्पर्धेबाबत आपण उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं. या स्पर्धेमध्ये ९० किलोमीटर अंतर केवळ १२ तासांमध्ये पूर्ण करावं लागणार आहे. मॅरेथॉनचे ९० किमी अंतर ११ तासात पूर्ण करण्याचे ध्येय असल्याचे अग्रवाल सांगतात.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. चित्रलेखा पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **सल्लागार संचालक : सौ. सुप्रिया पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : सौ. चित्रलेखा पाटील** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)